
कोष्टकांशी सुसंगती साधण्यासाठी
आलेख उलटे लावले आहेत.

// आलेख क्रमांक - १ //

को.क्र. ५.१ प्रतिसादक प्राचार्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार वर्गीकरण.

प्रमाण १ सेमी. = १0%



### कोष्टक क्रमांक ५.१

### प्राचार्यांचे शेक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार वर्गीकरण.

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | बी.ए.बी.एड | ०४ | २३.५३ |
| २. | बी.एस्सी.बी.एड | ०२ | ११.७६ |
| ३. | बी.एस्सी.एम.एड | ०२ | ११.७६ |
| ४. | एम.ए. बी.एड | ०५ | २९.४२ |
| ५. | एम.ए.एम.एड | ०४ | २३.५३ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१ वरून असे दिसून येते की, प्रतिसादक प्राचार्य बी.ए.बी.एड व बी.एस्सी.बी.एड प्रत्येकी २ (११.७६%) होते. याचा अर्थ ३५.२९% प्राचार्य फक्त प्रशिक्षित पदवीधर होते. राहीलेले बी.एस्सी.एम.एड २ (११.७६%) होते. एम.ए.बी.एड ५ (२९.४२%) प्राचार्य होते. ४ (२३.५३%) प्राचार्य एम.ए.एम.एड होते. याचा अर्थ ६४.७१% प्राचार्य पदव्युत्तर प्रशिक्षण घेतलेले होते.


यावरून सर्व प्राचार्य योग्य ती शैक्षणिक पात्रता धारण करणारे असून त्यातील ६४.७१% पदव्युत्तर प्रशिक्षण घेतलेले होते. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब चांगली वाटली तरी N.C.E.T.च्या नियमानुसार सर्व प्राचार्य एम.ए.एम.एड किंवा एम.एस्सी.एम.एड असावेत असे संशोधकाला वाटते.

कोणत्याही शाखाचे प्रमुख प्राचार्य अगर मुख्याध्यापक योग्य त्या शैक्षणिक गुणवत्तेचे असणे आवश्यक आहे. तसेच त्यांना अध्यापनाचा व प्रशासनाचा अनुभव असणे त्या विद्यालयाच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्वाचे असते. त्यांचा प्रभाव उपशिक्षकावर पडतो व त्यांची कामाची गुणवत्ता चांगली राहते. यासाठी प्रश्न क्रमांक ३रा प्राचार्यांच्या अनुभवाविषयी होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.२ मध्ये देण्यात आली आहे.

// आलेख क्रमांक - २ //

को.क्र. ५.२ प्रतिसादक प्राचार्यांचे अनुभवाचे वर्गीकरण.

प्रमाण १ से.मी. = १०%



**कोष्टक क्रमांक ५.२**

**प्रतिसादक प्राचार्यांच्या अनुभवाचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप (अनुभव वर्षे) | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १ वर्षापेक्षा कमी अनुभव. | ०४ | २३.५३ |
| २. | १ वर्ष ते १० वर्षे. | १२ | ७०.५९ |
| ३. | ११ वर्षे ते २० वर्षे. | ०१ | ०५.८८ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयातील प्राचार्यांना प्राचार्य पदाचा एक वर्षापेक्षा कमी अनुभव असणाऱ्यांचे प्रमाण ४(२३.५३%) होते. १२ (७०.५९%) प्राचार्यांना एक ते दहा वर्षे पर्यंत प्रशासनाचा अनुभव होता. एका (५.८८%) प्राचार्यांना २० वर्षापर्यंतचा प्रशासनाचा अनुभव होता.

यावरून १० वर्षापर्यंतचा प्रशासनाचा अनुभव असणाऱ्या प्राचार्यांचे प्रमाण १२ (७०.५९%) होते. प्राचार्य योग्य त्या अनुभवाचे होते. त्यांच्याकडून मिळालेली माहिती उपयोगी होती. ही बाब समाधानकारक होती. सर्व अध्यापक विद्यालयांचे प्रचार्य जास्त अनुभवाचे असावेत असे संशोधकास वाटते.

**ब. अध्यापक विद्यालयाच्या व्यवस्थापनाविषयी माहिती.**


या विभागात अध्यापक विद्यालयाच्या व्यवस्थापना संबंधी प्रश्न विचारले होते. प्रश्न क्र. ४ ते ८ पर्यंत असे एकूण ५ प्रश्न विचारले होते.

प्रशासनाचा एक महत्वाचा घटक म्हणजे ती विद्यालये चालविणाऱ्या संस्था, त्यांचे व्यवस्थापन, संस्थेच्या व्यवस्थापनावर त्या विद्यालयाची गुणवत्ता अवलंबून असते. अनेक संस्थाचालक राजकीय वजन वापरून शाळा, अध्यापक विद्यालये विना अनुदानित तत्वावर सुरू करतात. त्या शाळांची गुणवत्ता खुपच खालच्या पातळीवर असते. सोलापूर जिल्ह्यातील ह्या १७ अध्यापक विद्यालयापैकी विनाअनुदानित

// आलेख क्र. - ३ //

को.क्र. ५.३ अनुदानित अध्यापक विद्यालय, विनाअनुदानित अध्यापक विद्यालय यांचे वर्गीकरण.

प्रमाण :-३६ = १0% विद्यालय.



किती विद्यालये होती, अनुदानित किती होती हे जाणण्यासाठी प्रश्न ४था हा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.३ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.३**

**अनुदानित अध्यापक विद्यालय, विना अनुदानित अध्यापक विद्यालयांचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शासकीय अनुदानित अध्यापक विद्यालय | ०१ | ०५.८८ |
| २. | खाजगी संस्थेचे अनुदानित अध्यापक विद्यालय | ०६ | ३५.३० |
| ३. | खाजगी संस्थेचे विनाअनुदानित अध्यापक विद्यालय | १० | ५८.८२ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३ वरून असे दिसून येते की एक (५.८८%) अध्यापक विद्यालय शासकीय अनुदानित अध्यापक विद्यालय होते. ६ (३५.३०%) अध्यापक विद्यालये खाजगी संस्थांनी चालविलेली अनुदानित होती. १० (५८.८२%) अध्यापक विद्यालये खाजगी संस्थेचे विनाअनुदानित तत्वावर चालविलेली होती.


यावरून सोलापूर जिल्ह्यातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालये अनुदानित अध्यापक विद्यालयांच्या तुलनेत जास्त होती. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब चांगली नव्हती. सोलापूर जिल्ह्यात जी विनाअनुदानित अध्यापक विद्यालये आहेत ती सर्व शासनाने अनुदानित करावीत असे संशोधकास वाटते.

१९५६ साली भारतामध्ये भाषावार प्रांतरचना करण्यात आली. त्यानुसार मराठी भाषिकांचे महाराष्ट्र हे राज्य निर्माण झाले. मातृभाषेतून शिक्षण देण्यात यावे असे घटनेत नमूद केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्रामध्ये मराठी माध्यमातून प्राथमिक शिक्षण दिले जाते. अध्यापक विद्यालयातून प्राथमिक शिक्षक तयार होतात. सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांपैकी मराठी माध्यमाची किती विद्यालये इंग्रजी, कन्नड, उर्दू इत्यादी माध्यमाची किती विद्यालये होती हे जाणण्यासाठी प्रश्न क्रमांक ५वा

// आलेख क्र. - ४ //

को.क्र. ५.४ अध्यापक विद्यालयांच्या माध्यमानुसार वर्गीकरण.

प्रमाण. १ से.मी. = १०%



विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.४ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.४**

**अध्यापक विद्यालयांच्या माध्यमानुसार वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप (माध्यम) | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मराठी माध्यम | १३ | ७६.४७ |
| २. | इंग्रजी माध्यम | ०१ | ०५.८८ |
| ३. | कन्नड माध्यम | ०१ | ०५.८८ |
| ४. | उर्दू माध्यम | ०२ | ११.७७ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.४ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी १३ (७६.४७%) अध्यापक विद्यालये मराठी माध्यमाची होती तर एक (५.८८%) अध्यापक विद्यालय इंग्रजी माध्यमाचे होते. एक (५.८८%) अध्यापक विद्यालय कन्नड माध्यमाचे होते. २ (११.७७%) अध्यापक विद्यालये उर्दू माध्यमाची होती.

यावरून सोलापूर जिल्ह्यात इतर माध्यमापेक्षा मराठी माध्यमाची अध्यापक विद्यालये जास्त होती. इंग्रजी, कन्नड, उर्दू माध्यमाची विद्यालये कमी होती. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब चांगली होती.

प्रश्न ६वा अध्यापक विद्यालये मुलांची, मुलींची यापैकी कोणत्या प्रकारची आहेत असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.५ मध्ये देण्यात आली आहे.

### कोष्टक क्रमांक ५.५

### मुलामुलींच्या प्रकारानुसार अध्यापक विद्यालयांचे वर्गीकरण.

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मुलांचे | ०१ | ०५.८८ |
| २. | मुलींचे | ०३ | १७.६५ |
| ३. | मिश्र. | १३ | ७६.४७ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टकावरून १७ अध्यापक विद्यालयांपैकी ०१ (५.८८%) अध्यापक विद्यालय फक्त मुलांचे होते. तर ३ (१७.६५%) अध्यापक विद्यालये मुलींची होती. १३(७६.४७%) अध्यापक विद्यालये मिश्र होती.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांपैकी १३ (७६.४७%) अध्यापक विद्यालये ही सहशिक्षण देणारी होती. तर ३(१७.६५%) खास मुलींसाठी वेगळी होती. ही बाब मुलींच्या प्रशिक्षणाच्या दृष्टीने खुपच चांगली गोष्ट होती.

जिल्ह्यातील एकूण अध्यापक विद्यालयांपैकी २५% अध्यापक विद्यालये मुलींची असावीत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.७वा विद्यालयाचे व्यवस्थापन कोणत्या प्रकारचे आहे हे जाणून घेण्यासाठी विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.६ मध्ये देण्यात आली आहे.

### कोष्टक क्रमांक ५.६

### व्यवस्थापनाच्या प्रकारानुसार विद्यालयांचे वर्गीकरण.

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | विद्यालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | खाजगी संस्था | १६ | ९४.१२ |
| २. | महाराष्ट्र शासन | ०१ | ०५.८८ |
| | एकूण | १७ | १००.०० |

उपरोक्त कोष्टक क्रमांक ५.६ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांपैकी १६ (९४.१२%) अध्यापक विद्यालये खाजगी संस्थेची होती. तर एक (५.८८%) अध्यापक विद्यालय महाराष्ट्र शासन संचलित होते.

यावरून सोलापूर जिल्ह्यात खाजगी संस्थेची विद्यालये महाराष्ट्र शासनाच्या विद्यालयांच्या तुलनेत जास्त होती. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब चांगली नव्हती.

अध्यापक विद्यालयांच्या गुणवत्तेनुसार विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची अध्यापक विद्यालये जास्त असावीत असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्रमांक ८वा विद्यालयातील एकूण तुकडयातील विद्यार्थी संख्या किती? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.७ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.७**

**विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार अध्यापक विद्यालयांचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ६0 ते ८0 विद्यार्थी संख्या | १0 | ५८.८२४ |
| २. | १३0 ते १६0 विद्यार्थी संख्या | 0७ | ४१.१७६ |
| | एकूण | १७ | १00.00 |

वरील कोष्टक क्रमांक ५.७ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांपैकी १0 (५८.८२४%) अध्यापक विद्यालयात ६0 ते ८0 विद्यार्थी संख्या होती. तर ७ (४१.७६%) विद्यालयात १३0 ते १६0 विद्यार्थी संख्या होती.

यावरून १0(५८.८२४%) विद्यालयात ६0 ते ८0 च्या दरम्यान विद्यार्थी संख्या होती. ही विद्यालये खाजगी विनाअनुदानित होती. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब चांगली नव्हती.

महाराष्ट्र शासनाने विनाअनुदानित विद्यालयांचे रूपांतर अनुदानित विद्यालयात करावे व विद्यार्थी संख्येत वाढ करण्यात यावी असे संशोधकास वाटते.

## क. भौतिक सुविधांविषयी माहिती.

कोणत्याही विद्यालयातील विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात भौतिक सुविधा पुरेशा असाव्या लागतात. वर्गखोल्या, शिक्षक खोल्या, प्राचार्यासाठी कार्यालय, ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली, प्रयोगशाळेसाठी स्वतंत्र खोली असणारी पक्की, हवेशीर, प्रदुषण मुक्त इमारत, विद्यार्थ्यांसाठी पुरेशा खोल्या, कार्यालयासाठी फर्निचर, आरोग्यासाठी स्वच्छ प्रसाधनगृहे, क्रीडांगण असावे लागते. या सुविधा प्रत्येक अध्यापक विद्यालयात आहेत का? हे पाहण्यासाठी भौतिक सुविधा या विभागात प्रश्न क्र.९ ते ३१ असे एकूण २३ प्रश्न विचारले होते.

या विभागातील ९ वा प्रश्न विद्यालयास स्वत:ची पुरेशी इमारत आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १५ (८८.२४%) अध्यापक विद्यालयास स्वत:ची पुरेशी इमरत होती तर २ (११.७६%) अध्यापक विद्यालयास स्वत:ची पुरेशी इमारत नव्हती.

संशोधकाने प्रत्येक विद्यालयातील दोन शिक्षक याप्रमाणे १७ विद्यालयातील ३४ शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये विद्यालयास स्वत:ची पुरेशी इमारत आहे का? असा प्रश्न विचारला होता त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.


२४ (७0.५८%) प्रतिसादक शिक्षकांनी विद्यालयास स्वत:ची पुरेशी इमारत होती असे सांगितले. १0 (२९.४२%) प्रतिसादक शिक्षकांनी विद्यालयास स्वत:ची पुरेशी इमारत नव्हती असे सांगितले.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात १२ विद्यालयांमध्ये स्वत:च्या पुरेशा इमारती होत्या. ३ विद्यालयामध्ये स्वत:च्या पुरेशा इमारती नव्हत्या. त्यातील ३ विद्यालये संस्थेच्या माध्यमिक विद्यालयांमध्ये भरत होती. कारण माध्यमिक विद्यालयाची वेळ दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत होती. म्हणून सकाळी ७.३0 ते १२ वाजेपर्यंत अध्यापक विद्यालय त्या इमारतीमध्ये भरत होते. २ विद्यालयामधील इमारती पुरेशा नव्हत्या. लहान खोल्या, कार्यालय, ग्रंथालय यांना स्वतंत्र खोली नव्हती हे दिसून आले. परंतु ५ विद्यालयांना स्वत:ची पुरेशी इमारत नव्हती ही खरी माहिती प्रतिसादक प्राचार्य लपवित असल्याचे दिसून आले.

// आलेख क्र. - ५ //

को.क्र. ५.८ इमारतीच्या प्रकारानुसार अध्यापक विद्यालयांचे वर्गीकरण.

प्रमाण १ सेमी = १०%



यावरून सोलापूर जिल्ह्यात १२ (७०.५८%) अध्यापक विद्यालयांना संस्थेच्या स्वत:च्या पुरेशा इमारती होत्या ही चांगली गोष्ट होती.

प्रत्येक अध्यापक विद्यालयाला स्वत:ची स्वतंत्र व पुरेशी इमारत असावी असे संशोधकास वाटते. प्रश्न १० वा इमारत नसल्यास त्या कोणाच्या मालकीच्या आहेत? असा विचारला होता. प्रतिसादक प्रचार्यांनी दिलेल्या माहितीवरून १५(८८.२४%) विद्यालयामध्ये संस्थेच्या स्वत:च्या इमारती होत्या. २(११.७६%) विद्यालयामध्ये इमारती भाडे तत्वावर होत्या.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये इमारत कोणाच्या मालकीची आहे? असा विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२४(७०.५८%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, विद्यालयाच्या इमारती स्वत:च्या होत्या. ६ (१७.६४%)प्रतिसादक शिक्षकांनी विद्यालयाच्या इमारती ह्या त्याच संस्थेच्या माध्यमिक विद्यालयाच्या होत्या असे सांगितले. ४ (११.७६%) प्रतिसादक शिक्षकांनी विद्यालयाच्या इमारती भाडे तत्वावर घेतल्या होत्या असे सांगितले. हे शिक्षक प्रत्येक अध्यापक विद्यालयातील दोन याप्रमाणे होते.

यावरून १५ (८८.२४%) अध्यापक विद्यालयांना संस्थेच्या मालकीच्या इमारती होत्या. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब समाधानकारक होती.

प्रत्येक अध्यापक विद्यालयाला संस्थेच्या मालकीची इमारत असावी असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्र.११वा इमारतीचा प्रकार कोणता आहे? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.८ मध्ये दिली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.८**

**इमारतीच्या प्रकारानुसार अध्यापक विद्यालयांचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पक्की स्लॅब | १० | ५८.८२ |
| २. | पत्र्याची इमारत | ०५ | २९.४२ |
| ३. | कौलारू | ०२ | ११.७६ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.८ वरून असे दिसून येते की, १0(५८.८२%) अध्यापक विद्यालयाच्या इमारती पक्क्या स्लॅबच्या होत्या. ५(२९.४२%) अध्यापक विद्यालयाच्या इमारती पत्र्याच्या छताच्या होत्या तर २ (११.७६%) अध्यापक विद्यालयाच्या इमारती कौलारू होत्या.

संशोधकाने प्रत्येक विद्यालयातील दोन शिक्षक या प्रमाणे १७ विद्यालयातील ३४ शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये इमारतीचा प्रकार कोणता आहे? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२0 (५८.८२%) शिक्षकांनी विद्यालयाची इमारत पक्की स्लॅबची होती असे सांगितले. १0 (२९.९२%) प्रतिसादक शिक्षकांनी विद्यालयाच्या इमारती पत्र्याच्या छताच्या होत्या असे सांगितले तर ४ (११.७६%) प्रतिसादक शिक्षकांनी विद्यालयाची इमारत कौलारू होती असे सांगितले.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयांना भेटी दिल्या. त्यात १0 विद्यालयांची इमारत पक्की स्लॅबची होती. ५ विद्यालयाच्या इमारती पत्र्याच्या छताच्या होत्या तर २ विद्यालयाच्या इमारती कौलारू होत्या. यामध्ये माध्यमिक विद्यालयाची स्लॅबची इमारत अध्यापक विद्यालयासाठी वापरली जात होती म्हणून विना अनुदानित अध्यापक विद्यालयांनाही पक्क्या स्लॅबच्या इमारती होत्या हे दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुतांश ५८.८२% अध्यापक विद्यालयाच्या इमारती पक्क्या स्लॅबच्या होत्या. शिक्षकांच्या मुलाखतीतून व प्रत्यक्ष भेटीतून हे आढळून आले. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब चांगली होती. ज्या अध्यापक विद्यालयांना पक्क्या स्लॅबच्या इमारती नाहीत त्या संस्थाचालकांनी निधी जमा करून इमारती बांधाव्यात असे संशोधकास वाटते.

विद्यार्थ्यांचे अवधान टिकविण्यासाठी, वर्ग नियंत्रणासाठी परिणामकारक अध्यायन अध्यापन होण्यासाठी वर्ग खोल्यांची गरज असते. त्यासाठी प्रश्न क्रमांक १२ वा वर्ग खोल्या पुरेशा आहेत का? असा विचारला होता.

प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १४ (८२.३५%) अध्यापक विद्यालयामध्ये वर्गखोल्या पुरेशा होत्या. त्या इमारती चांगल्या होत्या. ३ (१७.६५%) अध्यापक विद्यालयांमध्ये वर्गखोल्या पुरेशा नव्हत्या.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये वर्गखोल्या पुरेशा आहेत का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२४ (७०.५८%) प्रतिसादक शिक्षकांनी विद्यालयामध्ये पुरेशा वर्गखोल्या होत्या असे सांगितले. १० (२९.४२%) प्रतिसादक शिक्षकांनी विद्यालयामध्ये वर्गखोल्या पुरेशा नव्हत्या असे सांगितले.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात १२ विद्यालयांमध्ये वर्गखोल्या पुरेशा होत्या तर ५ विद्यालयामध्ये वर्गखोल्या पुरेशा नव्हत्या हे दिसून आले. ही खरी माहिती प्रतिसादक प्राचार्य लपवित असल्याचे दिसते.

यावरून १२ (७०.५८%) अध्यापक विद्यालयामध्ये वर्गखोल्या पुरेशा होत्या हे शिक्षकांच्या मुलाखतीतून व प्रत्यक्ष भेटीतून दिसून आले. ही बाब समाधानकारक वाटत नाही. सर्वच अध्यापक विद्यालयामध्ये वर्गखोल्या पुरेशा असाव्यात असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्र.१३वा वर्गखोल्यांसाठी पुरेशी इमारत नसल्यास विद्यार्थ्यांची सोय कोठे केली जाते? असा प्रश्न विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १४ (८२.३५%) अध्यापक विद्यालयांना वर्गखोल्या पुरेशा होत्या. त्यामुळे त्यांना समस्याच येत नव्हत्या. ३ (१७.६५%) अध्यापक विद्यालयांमध्ये अपूरी इमारत असल्यामुळे संस्थेच्या माध्यमिक विद्यालयामध्ये वर्ग भरविले जातात असे सांगितले.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना म्हणजेच सर्व अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात १२ विद्यालयामध्ये वर्गखोल्या पुरेशा होत्या त्यामुळे त्यांना समस्या येत नव्हत्या तर ५ विद्यालयामध्ये वर्गखोल्या पुरेशा नव्हत्या ती अध्यापक विद्यालये संस्थेच्या माध्यमिक विद्यालयामध्ये वर्ग भरवित होते हे प्रत्यक्ष भेटी व निरीक्षणाच्या वेळी दिसून आले. प्रतिसादक प्राचार्यांनी १४ (८२.३५%) विद्यालयाना वर्ग खोल्या पुरेशा होत्या असे सांगितले परंतु प्रत्यक्ष भेटीच्या वेळी १२ (७०.५८%) विद्यालयांना वर्गखोल्या पुरेशा होत्या असे दिसून आले. ही खरी माहिती प्रतिसादक प्राचार्य लपवित असल्याचे दिसते.

यावरून १२ (७०.५८%) विद्यालयामध्ये वर्ग खोल्या पुरेशा होत्या तर ५(२९.४२%) विद्यालयामध्ये वर्गखोल्या पुरेशा नव्हत्या. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती. विना अनुदानित अध्यापक विद्यालयानांच वर्ग खोल्या पुरेशा नव्हत्या. या विद्यालयाना अनुदान मिळत नसल्यामुळे संस्थाचालक इमारत बांधणीकडे दुर्लक्ष करत होते. या विद्यालयांनाही संस्थाचालकांनी पुरेशा वर्गखोल्या बांधून द्याव्यात असे संशोधकास वाटते.

शैक्षणिक कार्यामध्ये शिक्षक, विद्यार्थी हे जेवढे महत्वाचे घटक आहेत तेवढेच महत्वाचे घटक म्हणजे फर्निचर होय. टेबल, खुर्ची, डेस्क, कपाट, स्टूल इत्यादी फर्निचर या घटकामध्ये समाविष्ट होतात. फर्निचर जर उपलब्ध असेल तर अध्ययन व अध्यापन चांगले होते. हे जाणण्यासाठी प्रश्न क्र.१४ वा, विद्यालयात पुरेसे फर्निचर आहे का ? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेल्या माहिती वरून १७ अध्यापक विद्यालयापैकी ११ (६४.७०%) विद्यालयामध्ये पुरेसे फर्निचर होते तर ६ (३५.३०%) विद्यालयामध्ये पुरेसे फर्निचर नव्हते.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयास प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यातील ११ विद्यालयामध्ये पुरेसे फर्निचर होते तर ६ विद्यालयामध्ये पुरेसे फर्निचर नव्हते हे दिसून आले.

यावरून ११(६४.७०%) विद्यालयामध्ये पुरेसे फर्निचर होते तर ६ (३५.३०%) विद्यालयामध्ये पुरेसे फर्निचर नव्हते. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब चांगली नव्हती. अध्यापक विद्यालयात पुरेसे फर्निचर असावे असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्रमांक १५ वा, फर्निचर नसल्यास विद्यार्थ्यांची बैठकीची व्यवस्था कशी करता? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार ११ (६४.७०%) अध्यापक विद्यालयामध्ये पुरेसे फर्निचर होते त्यामुळे त्यांना विद्यार्थ्यांच्या बैठकीची व्यवस्था ही समस्या येत नव्हती. ही समस्या ६(३४.३०%) विद्यालयांना येत होती.ह्या बाबतीत अपुरे फर्निचर असल्यामुळे संस्थेच्या माध्यमिक विद्यालयातील फर्निचर वापरले जात होते. हे माध्यमिक विद्यालय व अध्यापक विद्यालय ही एकाच संस्थेची होती.

यावरून ११(६४.७०%) अध्यापक विद्यालयामध्ये पुरेसे फर्निचर होते तर ६(३५.३०%) अध्यापक विद्यालयात अपुरे फर्निचर असल्यामुळे संस्थेच्या माध्यमिक विद्यालयातील फर्निचर वापरत होते. अध्यापक विद्यालयात पुरेसे फर्निचर असावे असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १६वा, विद्यालयातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कशी केली जाते? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र.५.९ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.९**

**पिण्याच्या पाण्याच्या सोईनुसार अध्यापक विद्यालयांचे वर्गिकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | नळ योजना | 0९ | ५२.९४ |
| २. | हात पंप | 0६ | ३५.३0 |
| ३. | विहीर | 0२ | ११.७६ |
| | एकूण | १७ | १00.00 |

वरील कोष्टक क्रमांक ५.९ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ९(५२.९४%) अध्यापक विद्यालयामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नळ योजनेद्वारे होती. ६ (३५.३0%) विद्यालयामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था हातपंपाद्वारे होती तर २(११.७६%) विद्यालयामध्ये विहीरीमार्फत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होती.

संशोधकाने प्रत्येक विद्यालयातील दोन शिक्षक याप्रमाणे १७ अध्यापक विद्यालयातील ३४ शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कशी केली जाते? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

१६ (४७.0९%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नळ योजनेद्वारे केली होती. १२ (३५.३0%) शिक्षकांनी सांगितले की, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था हातपंपाद्वारे केली होती. ४ (११.७६%) शिक्षकांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था विहीरीद्वारे केली

होती असे सांगितले तर २ (५.८८%) शिक्षकांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नळाद्वारे असून ते माध्यमिक विद्यालय व अध्यापक विद्यालय या दोन्हीमध्ये समाईक होते असे सांगितले.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात ८ विद्यालयामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नळ योजनेद्वारे होती. ६ अध्यापक विद्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था हातपंपाद्वारे होती. ३ विद्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती हे दिसून आले.

यावरून बहुतांश ८२.३६% अध्यापक विद्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होती हे शिक्षकांच्या मुलाखतीतून व भेटीतून आढळून आले. ही बाब समाधानकारक वाटते. अन्न, वस्त्र, आरोग्य, निवारा व शिक्षण ह्या व्यक्तिंच्या मुलभूत गरजा आहेत. पाणी हे अतिआवश्यक गरजेत मोडते. यासाठी सर्व अध्यापक विद्यालयामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी असे संशोधकाला वाटते.

शैक्षणिक प्रशासकीय कामे करण्यासाठी स्वतंत्र खोलीची आवश्यकता आहे. जेणेकरून प्राचार्य आपली कामे व्यवस्थित पार पाडू शकतील. त्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयामध्ये प्राचर्यासाठी कार्यालय आहेत का हे जाणण्यासाठी प्रश्न क्र.१७वा, प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालय आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १२ (७०.५८%) विद्यालयांमध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालय होते तर ५(२९.४२%) विद्यालयामध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालय नव्हते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालय आहे का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यानी पुढील उत्तरे दिली.

२०(५८.५२%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालय होते. तर १४ (४१.१८%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालय नव्हते.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील सर्वच म्हणजे १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात १० अध्यापक विद्यालयांमध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालये होती तर ७ अध्यापक विद्यालयांमध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालये नव्हते असे दिसून आले. सर्वच प्राचार्य खरी माहिती देत नव्हते.

मुलाखतीमध्ये व प्रत्यक्ष पाहणीत ७ अध्यापक विद्यालयांमध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालय नव्हते हे दिसून आले.

यावरून १०(५८.५२%) विद्यालयामध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालय होते तर ७ (४१.१८%) विद्यालयांमध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालय नव्हते. सर्व प्राचार्यांना स्वतंत्र कार्यालय असावे. ज्या विद्यालयांमध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालये नाहीत त्या संस्थाचालकांनी धनिक लोकांकडून देणग्या घ्याव्यात किंवा त्यांच्याकडून खोली बांधून घ्यावी. अशा प्रकारच्या योजना संस्थाचालकांनी किंवा प्राचार्यांनी राबवून खोली बांधता येईल. त्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत असे संशोधकास वाटते.

अध्यापक विद्यालये तासवारीनुसार चालतात. ज्या वेळीस तास रिकामा (ऑफ) असतो त्यावेळी तास नसणारा शिक्षक खोलीत बसून पुढील तासाची तयारी करू शकेल अथवा विश्रांती घेवू शकेल यासाठी शिक्षक खोली असणे आवश्यक असते. प्रत्येक अध्यापक विद्यालयात स्वतंत्र शिक्षक खोली आहे का? हे जाणण्यासाठी प्रश्न क्र.१८वा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांनी दिलेल्या माहितीनुसार सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी १४(८२.३५%) विद्यालयामध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली होती तर ३(१७.६५%) विद्यालयामध्ये स्वतंत्र खोली नव्हती.

संशोधकाने प्रत्येक विद्यालयातील दोन शिक्षक याप्रमाणे १७ विद्यालयातील ३४ शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये स्वतंत्र शिक्षक खोली आहे का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

१८(५२.९४%) शिक्षकांनी शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली होती असे सांगितले तर १६ (४७.०६%) शिक्षकांनी स्वतंत्र खोली नव्हती असे सांगितले.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात ९ अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली होती तर ८ अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली नव्हती. यावरून सर्वच प्राचार्य खरी माहिती देत नव्हते. शिक्षक मुलाखतीमध्ये व प्रत्यक्ष पाहणीत ८ अध्यापक विद्यालयामध्ये स्वतंत्र शिक्षक खोल्या नव्हत्या ही फारच वाईट गोष्ट होती असे दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य ४७.0६% अध्यापक विद्यालयात शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली व इतर सुखसोयी नव्हत्या ही फारच वाइट गोष्ट होती. अध्यापक विद्यालयातील शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली असावी असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १९वा, शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली नसल्यास पर्यायी व्यवस्था कशी करता? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीवरून १४(८२.३५%) विद्यालयामध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली होती. त्यामुळे त्यांनी पर्यायी व्यवस्था करण्याची गरज भासत नव्हती तर ३ (१७.६५%) विद्यालयामध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली नव्हती त्यामुळे शिक्षकांची बैठक व्यवस्था कार्यालयामध्ये केली जात होती. ही विद्यालये विनाअनुदानित होती.


संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ९ अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली होती तर ८ अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली नसल्यामुळे शिक्षकांची बैठकीची व्यवस्था कार्यालयामध्ये केली होती.

यावरून ४७.0६% विद्यालयांमध्ये शिक्षकांची बैठकीची व्यवस्था कार्यालयामध्ये केली होती ही बाब योग्य वाटत नाही. खोली बांधण्यासाठी प्रशासनाने संस्था चालकांकडून किंवा समाजवर्गणीतून शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली उपलब्ध करावी असे संशोधकाला वाटते.

कोणत्याही विद्यालयामध्ये अध्यापनाची परिणामकारकता वाढविण्यासाठी शैक्षणिक साहित्याची आवश्यकता असते. कांही विद्यालयामध्ये शैक्षणिक साधनांची उपलब्धता नसते तर कांही विद्यालयामध्ये ती उपलब्धता असूनही शिक्षक ती वापरण्यास आळस करतात. म्हणून अध्यापनाचे काम कमी गुणवत्तेचे होते. सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयामध्ये अशा साधनांची उपलब्धता आहे का? हे पाहण्यासाठी प्रश्न क्र.२0वा, विद्यालयाकडे कोणती शैक्षणिक साधने उपलब्ध आहेत ? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.१0 मध्ये देण्यात आली आहे.

// आलेख क्र. - ६ //

को.क्र. ५.१० अध्यापक विद्यालयांचे उपलब्ध शैक्षणिक साधनानुसार वर्गीकरण.



**कोष्टक क्रमांक ५.१०**

**अध्यापक विद्यालयातील उपलब्ध शैक्षणिक साधनानुसार वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | दूरदर्शन संच | १० | ५८.८२ |
| २. | रेडिओ | १४ | ८२.३५ |
| ३. | टेपरेकॉर्डर | १३ | ७६.४७ |
| ४ | गणित पेटी | १५ | ८८.२३ |
| ५ | भूमिती पेटी | १४ | ८२.३५ |
| ६ | पृथ्वी गोल | १५ | ८८.२३ |
| ७ | नकाशे व तक्ते | १२ | ७०.५८ |
| ८ | विज्ञान पेटी | ०९ | ५२.९४ |
| ९ | फ्लॅनेल बोर्ड | ०७ | ४१.१७ |

वरील कोष्टक क्रमांक ५.१०चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ विद्यालयापैकी १०(५८.८२%) विद्यालयामध्ये दूरदर्शन संच होते. १४(८२.३५%) विद्यालयामध्ये रेडिओ होते. १३ (७६.४७%) विद्यालयामध्ये टेपरेकॉर्डर होते. १५(८८.२३%) विद्यालयामध्ये गणित पेटी व पृथ्वी गोल होते. १४(८२.३५%) विद्यालयामध्ये भूमिती पेटी होती. १२(७०.५८%) विद्यालयामध्ये नकाशे व तक्ते होते. ९ (५२.९४%) विद्यालयामध्ये विज्ञान पेटी होती. ७ (४१.१७%) विद्यालयाकडे फ्लॅनेल बोर्ड उपलब्ध होते.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात १० विद्यालयामध्ये दूरदर्शन संच, रेडिओ, गणित पेटी, भूमिती पेटी, टेपरेकॉर्डर, पृथ्वी गोल, नकाशे व तक्ते, फ्लॅनेल बोर्ड ही शैक्षणिक साधने उपलब्ध होती. तर ७ विद्यालयामध्ये गणित पेटी, भूमिती पेटी, टेपरेकॉर्डर, फ्लॅनेल बोर्ड ही शैक्षणिक साधने उपलब्ध नव्हती हे दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुतांश ५८% अध्यापक विद्यालयामध्ये शैक्षणिक साधने उपलब्ध होती. ती साधने त्या त्या अध्यापक विद्यालयांनी वापरात ठेवून विद्यार्थ्यांची गोडी व आकलन

क्षमता वाढवावी. त्यामुळे विद्यार्थी अधिक हुशार होतील व त्यांची विद्यालयाबद्दलची ओढ वाढेल तसेच शिक्षकांचे अध्यापन परिणामकारक होईल. ज्या विद्यालयामध्ये शैक्षणिक साधने अपूरी आहेत त्या सर्वच विद्यालयांची गरज शासनाने व संस्थेने पूर्ण करावी असे संशोधकाला वाटते.

शारीरिक विकास हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाचा एक भाग आहे. शरीराने सुदृढ असणारी बालकेच मनाने आणि बुद्धीने सुदृढ असतात. जर मुलांचे शरीर सुदृढ असेल तर त्यांचे मन निकोप राहील. मनाच्या आणि शरीराच्या समन्वयातूनच बुद्धीची कार्यक्षमता वाढते त्यासाठी शरीर हा पाया आहे. म्हणून क्रीडांगणाची सोय आवश्यक आहे हे जाणण्यासाठी प्रश्न क्र.२१ वा अध्यापक विद्यालयाला स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की १२ (७०.५८%) अध्यापक विद्यालयाला स्वत:च्या मालकीचे क्रिडांगण होते. २ (११.७७%) अध्यापक विद्यालयाला स्वत:च्या मालकीचे क्रिडांगण नव्हते तर ३ (१७.६५%) अध्यापक विद्यालयांना स्वत:च्या मालकीचे अपूरे क्रिडांगण होते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये विद्यालयाला स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण आहे का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२४ (७०.५८%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की विद्यालयाला स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण होते तर १० (२९.४२%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की विद्यालयाला स्वत:च्या मालकीचे क्रिडांगण नव्हते.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात १२ विद्यालयांना स्वत:चे क्रीडांगण होते तर ५ विद्यालयांना स्वत:चे क्रिडांगण नव्हते. त्यातील ३ विद्यालये संस्थेच्या माध्यमिक विद्यालयाचे क्रीडांगण वापरत होते तर २ अध्यापक विद्यालये संस्थेच्या महाविद्यालयाचे क्रिडांगण वापरत होते असे दिसून आले.

प्रश्नावलीतील माहितीनुसार पाच अध्यापक विद्यालयांना स्वत:चे क्रीडांगण नव्हते. हीच माहिती शिक्षक मुलाखतीतून व प्रत्यक्ष भेटीतून सिद्ध झाली.

यावरून ५(२९.४२%) अध्यापक विद्यालयांना स्वत:चे क्रीडांगण नव्हते. त्यातील ३ (१७.६५%)विद्यालयांना त्यांच्याच माध्यमिक विद्यालयातील क्रीडांगणाचा वापर करता येत होता तर २

(११.७७%) विद्यालये त्याच संस्थेच्या महाविद्यालयीन क्रीडांगणाचा उपयोग करीत होते. यावरून सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांना क्रीडांगणाची उपलब्धता कोणत्या ना कोणत्या स्वरूपात प्राप्त होती. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब चांगली होती. अध्यापक विद्यालयामध्ये क्रीडांगण स्वत:च्या मालकीचे व पुरेसे असावे असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्र.२२ वा अध्यापक विद्यालयात खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांपैकी १४ (८२.३५%) अध्यापक विद्यालयाकडे खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध होते तर ३ (१७.६५%) अध्यापक विद्यालयाकडे खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध नव्हते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये विद्यालयात खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध आहे का? असा प्रश्न विचारला होता त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२0 (५८.८२%) शिक्षकांनी विद्यालयात खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध होते असे सांगितले. तर १४ (४१.१८%) शिक्षकांनी विद्यालयात खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध नव्हते असे सांगितले.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना भेटी दिल्या त्यात ८ विद्यालयांमध्ये खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध होते तर २ विद्यालयांमध्ये खेळाचे साहित्य अपूरे होते. ७ विद्यालयांमध्ये खेळाचे साहित्य उपलब्ध नव्हते हे दिसून आले. मुलाखतीमधून व प्रत्यक्ष पाहणीत ७ अध्यापक विद्यालयांकडे खेळाचे साहित्य उपलब्ध नव्हते. यावरून सर्वच प्राचार्य खरी माहिती देत नव्हते.

यावरून १0 (५८.८२%) अध्यापक विद्यालयांकडे खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध होते तर ७ (४१.१८%) अध्यापक विद्यालयांमध्ये खेळाचे साहित्य उपलब्ध नव्हते. ही बाब योग्य नव्हती.

७ (४१.१८%) विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांकडे खेळाचे साहित्य नव्हते. खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी संस्थाचालकांनी/शासनाने प्रयत्न करून खेळाचे साहित्य उपलब्ध करावे असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्र.२३वा खेळाचे साहित्य पुरेसे उपलब्ध नसल्यास कोणत्या अडचणी येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १४ (८२.३५%) अध्यापक विद्यालयांकडे खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध होते. त्यामुळे त्यांना कोणत्याच प्रकारच्या समस्या

येत नव्हत्या. ३ (१७.६५%) अध्यापक विद्यालयांमध्ये खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध नव्हते त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध खेळाचे प्रशिक्षण देता येत नव्हते. खेळ शिकविण्यासाठी अथवा शिकण्यासाठी साहित्याची गरज असते इत्यादी अडचणी येत होत्या.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. १0 विद्यालयांमध्ये खेळाचे साहित्य उपलब्ध होते तर ७ विद्यालयांमध्ये खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध नव्हते. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध खेळाचे प्रशिक्षण देता येत नव्हते. क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यार्थी टिकाव धरू शकत नव्हते. खेळ शिकविण्यासाठी अथवा शिकण्यासाठी साहित्याची गरज असते इत्यादी समस्या येत होत्या.

यावरून ७ (४१.१८%) अध्यापक विद्यालयांमध्ये खेळाचे साहित्य उपलब्ध नव्हते त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध खेळाचे प्रशिक्षण देता येत नव्हते. क्रीडा स्पर्धेमध्ये पराजय इत्यादी समस्या येत होत्या.

खेळ शिकविण्यासाठी अथवा शिकण्यासाठी साहित्याची गरज असते त्यासाठी प्रशासनाने शासनाकडून अनुदान मिळवून किंवा संस्था चालकाकडून खेळाचे साहित्य उपलब्ध करावे असे संशोधकाला वाटते.

विद्यालयामध्ये समृद्ध ग्रंथालय असणे आवश्यक असते. ग्रंथालयाला पुरेशी जागा, पुरेशी पुस्तके व स्वतंत्र ग्रंथपाल उपलब्ध असेल तर त्या विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांना वाचण्यास पुस्तके मिळतात. त्यांचे ज्ञान अद्ययावत राहू शकते. त्यांना विषयाची आवड निर्माण होऊ शकते. सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयामध्ये ग्रंथालयाची स्थिती कशी आहे हे पाहण्यासाठी प्रश्न क्र.२४वा, विद्यालयात ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांपैकी ८ (४७.०५%) अध्यापक विद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली होती तर ९ (५२.९५%)अध्यापक विद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली नव्हती.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात ६ अध्यापक विद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली होती तर ११ अध्यापक विद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली नव्हती असे दिसून आले.

यावरून बहुसंख्य (६४.७०%) अध्यापक विद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली नव्हती. ही विनाअनुदानित अध्यापक विद्यालये असून ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली नव्हती. त्यासाठी संस्था चालकानी ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून खोली बांधावी. स्वतंत्र ग्रंथपालाची नेमणूक करावी. त्यासाठी प्रशासनाने जाणिवपूर्वक प्रयत्न करावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक २५वा, ग्रंथालयास स्वतंत्र खोली नसल्यास कोणत्या अडचणी येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, ८ (४७.०५%) अध्यापक विद्यालयांमध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली होती. त्यांना कोणत्याच प्रकारच्या समस्या येत नव्हत्या तर ९(५२.९५%) अध्यापक विद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली नव्हती. यापैकी ५ (२९.४२%) अध्यापक विद्यालये वर्गातील कपाटात पुस्तके ठेवत होती तर ४ (२३.५३%) अध्यापक विद्यालयात स्वतंत्र संच विद्यार्थ्यांना घरीच दिले होते.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात ६ अध्यापक विद्यालयांमध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली होती. त्यामुळे त्यांना कोणत्या अडचणी येत नव्हत्या तर ११ विद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोल्या नसल्यामुळे त्यातील ७ विद्यालयांमध्ये वर्गातील एका कपाटात ठेवलेले आढळले तर ४ विद्यालयांमध्ये स्वतंत्र पुस्तकांचा संच विद्यार्थ्यांना घरीच दिले होते.

यावरून ११ (६४.७०%) विद्यालयांमध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली नव्हती. त्यातील ७ (४१.१८%) विद्यालयांमध्ये वर्गातील एका कपाटात ठेवलेले आढळले. ४ (२३.५२%) विद्यालयांमध्ये स्वतंत्र पुस्तकांचे संच विद्यार्थ्यांना घरीच दिले होते. ही बाब विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढविण्याच्या दृष्टीने चांगली नव्हती.

प्रश्न क्र.२६वा ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ आहेत का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्या कडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १५(८८.२३%) अध्यापक विद्यालयामध्ये पुरेसे ग्रंथ उपलब्ध होते तर २(११.७७%) अध्यापक विद्यालयांमध्ये पुरेसे ग्रंथ उपलब्ध नव्हते.

संशोधकाने प्रत्येक विद्यालयातील दोन शिक्षक याप्रमाणे १७ विद्यालयातील ३४ शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ आहेत का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली. २० (५८.८२%) प्रतिसादक शिक्षकांनी ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ होते असे सांगितले तर १४ (४१.१८%) शिक्षकांनी ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ नव्हते असे सांगितले.

संशोधकाने १७ विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात १० विद्यालयांमध्ये पुरेसे ग्रंथ होते तर ७ विद्यालयामध्ये पुरेसे ग्रंथ नव्हते हे आढळून आले.

यावरून ७(४१.१८%) अध्यापक विद्यालयामध्ये पुरेसे ग्रंथ नव्हते. १०(५८.८२%) विद्यालयातील ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ उपलब्ध असले तरी संदर्भ ग्रंथांची संख्या कमी होती. पुस्तकांची देवघेव करण्यासाठी स्वतंत्र ग्रंथपाल नव्हता. त्यामुळे ग्रंथालयांची अवस्था अतिशय वाईट होती. ही स्थिती विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या दृष्टीने निश्चितच योग्य नव्हती. यासाठी ग्रंथपालाची नेमणूक करावी व पुस्तकांची संख्या वाढवावी असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्र.२७वा, पुरेसे ग्रंथ नसल्यास कोणत्या अडचणी येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १५ (८८.२३%) अध्यापक विद्यालयांमध्ये ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ होते. त्यामुळे त्यांना कोणत्याच प्रकारच्या समस्या येत नव्हत्या तर २(११.७७%) अध्यापक विद्यालयांमध्ये ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ नव्हते. पुरेसे ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अवांतर ज्ञान मिळत नसून विद्यार्थी अभ्यासामध्ये कच्चे इत्यादी अडचणी होत्या.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात १० विद्यालयांमध्ये पुरेसे ग्रंथ उपलब्ध होते त्यामुळे त्यांना अडचणी येत नव्हत्या तर ७ विद्यालयांमध्ये पुरेसे ग्रंथ उपलब्ध नव्हते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अवांतर ज्ञान मिळत नसून विद्यार्थी अभ्यासामध्ये कच्चे होते हे दिसून आले.

यावरून सर्व प्राचार्य खरी माहिती देत नव्हते. प्रत्यक्ष पाहणीत ७(४१.१८%) विद्यालयांमध्ये ग्रंथ उपलब्ध नव्हते त्यामुळे विद्यार्थ्यांना अवांतर ज्ञान नसून ते अभ्यासात कच्चे होते.

प्रश्न क्र.२८ वा, प्रयोगशाळा उपलब्ध आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १३ (७६.४७%) अध्यापक विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध होत्या तर ४ (२३.५३%) अध्यापक विद्यालयामध्ये प्रयोगशाळा उपलब्ध नव्हत्या.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध आहे का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली. १२(३५.३0%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध होती तर २२(६४.७0%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध नव्हती.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ६ अध्यापक विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा होत्या तर ११ विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा नव्हत्या हे दिसून आले.

यावरून ६(३५.३0%) अध्यापक विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा होती तर ११ (६४.७0%) अध्यापक विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा नव्हत्या हे शिक्षकांच्या मुलाखतीमधून व प्रत्यक्ष भेटीतून आढळून आले. ही बाब शास्त्र विषयाला महत्व देण्याच्या दृष्टीने अजिबात चांगली नव्हती. प्रत्येक अध्यापक विद्यालयास सुसज्ज प्रयोगशाळा असावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्र.२९वा, प्रयोगशाळा उपलब्ध नसल्यास प्रयोगाची सोय कशी केली जाते? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १३ (७६.४७%) अध्यापक विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध होती त्यामुळे त्यांना कोणत्याच प्रकारची समस्या नव्हती. तर ४(२३.५३%) अध्यापक विद्यालयामध्ये प्रयोगशाळा उपलब्ध नसल्यामुळे प्रयोगाची सोय वर्गात केली जात होती.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ६ अध्यापक विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध होत्या तर ११ विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध नसल्यामुळे प्रयोगाची सोय वर्गात केली होती.

यावरून ६ (३५.३0%) अध्यापक विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध होती तर ११ (६४.७0%) अध्यापक विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा नसल्यामुळे प्रयोगाची सोय वर्गात केली जात

होती. प्रयोग करण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी निर्माण करण्यासाठी प्रयोगशाळेची गरज असते. त्यासाठी अध्यापक विद्यालयामध्ये प्रयोगशाळा असावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.३० वा, प्रयोगशाळेमध्ये आवश्यक विज्ञान साहित्य उपलब्ध आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १० (५८.८२%) अध्यापक विद्यालयामध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध होते तर ७ (४१.१८%) अध्यापक विद्यालयांमध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध नव्हते. ही बाब असमाधानकारक आहे.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ८ अध्यापक विद्यालयामध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध होते तर ९ अध्यापक विद्यालयामध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध नव्हते हे दिसून आले.

यावरून सर्वच प्राचार्य खरी माहिती देत नव्हते. प्रत्यक्ष पाहणीत ९(५२.९४%) अध्यापक विद्यालयांकडे विज्ञान साहित्य उपलब्ध नव्हते. ही फारच वाईट गोष्ट होती.

विज्ञानामध्ये प्रात्यक्षिकाला जास्त महत्वाचे स्थान आहे. प्रात्यक्षिक केल्याशिवाय वैज्ञानिक ज्ञान प्राप्त होत नाही. विज्ञान साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडते. त्यासाठी विज्ञान साहित्य असणे आवश्यक आहे. शासनाकडून अनुदान किंवा संस्थाचालकांनी निधी उपलब्ध करून विज्ञान साहित्याची खरेदी करावी असे संशोधकाला वाटते.


प्रश्न ३१ वा, विज्ञान साहित्य नसल्यास कोणत्या अडचणी येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १० (५८.५२%) अध्यापक विद्यालयामध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध होते. त्यामुळे त्यांना कोणत्याच अडचणी येत नव्हत्या तर ७ (४१.१८%) अध्यापक विद्यालयामध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध नव्हते. विज्ञान साहित्य उपलब्ध नसल्यामुळे विज्ञानातील प्रयोग करता येत नव्हते. फक्त पुस्तके वाचून प्रयोग समजत नाही. प्रयोग साहित्य नसल्यामुळे नवीन ज्ञानाचे आकलन होत नव्हते.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ८ अध्यापक विद्यालयामध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध होते तर ९ अध्यापक विद्यालयांमध्ये विज्ञान साहित्य

// आलेख क्र. - ७ //

को.क्र. ५.११ अध्यापक विद्यालयातील स्त्री व पुरूष शिक्षकांचे वर्गीकरण.

प्रमाण ३६ =१0%



उपलब्ध नव्हते म्हणून फक्त पुस्तक वाचून प्रयोग समजत नव्हते. विद्यार्थ्यांना नवीन ज्ञानाचे आकलन होत नव्हते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन नव्हत्या इत्यादी समस्या येत होत्या.

यावरून ८(४७.०६%) अध्यापक विद्यालयांमध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध होते तर ९ (५२.९४%) अध्यापक विद्यालयांमध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्या विद्यालयांतील विद्यार्थ्यांना पुस्तक वाचून प्रयोग समजत नव्हते. नवीन ज्ञानाचे आकलन होत नव्हते. त्यांच्या अंगी वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव होता इत्यादी समस्या होत्या.

अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षक विद्यार्थ्याला विज्ञानातील प्रात्यक्षिक ज्ञान असणे गरजेचे असते. या विज्ञान ज्ञानाच्या आधारे नवीन पिढी घडविण्याचे काम असते व भविष्यकाळामध्ये त्याला विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करावयाचा असतो. यासाठी सर्व अध्यापक विद्यालयांमध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध असावे असे संशोधकाला वाटते.

**ड. शिक्षक प्रशासनासंबंधी माहिती :-**

या विभागात अध्यापक विद्यालयाच्या शिक्षक प्रशासनासंबंधी माहिती या संदर्भात प्रश्न विचारले होते. प्रश्न क्र.३२ ते ५१ असे एकूण २० प्रश्न विचारले होते.

या विभागातील ३२ वा प्रश्न, अध्यापक विद्यालयातील स्त्री व पुरूष शिक्षकांची संख्या किती? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र.५.११ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.११**

**अध्यापक विद्यालयातील स्त्री व पुरूष शिक्षकांचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्त्री शिक्षक | ४३ | २८.८५ |
| २. | पुरूष शिक्षक | १०६ | ७१.१५ |
| | एकूण | १४९ | **१००.००** |

वरील कोष्टक क्रमांक ५.११ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांमध्ये ४३ (२८.८५%) शिक्षिका काम करत होत्या. तर १०६ (७१.१५%) पुरूष शिक्षक काम करीत होते.

यावरून सोलापूर जिल्ह्यात स्त्री शिक्षिकांचे प्रमाण पुरूष शिक्षक संख्येपेक्षा कमी होते. ही बाब समाधानकारक वाटत नाही.

मुलांचे आणि मुलींचे प्रमाण समान असल्याने व मुलगा मुलगी समान हक्कामुळे स्त्री शिक्षिकांची संख्या समान असावयास हवी असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्र.३३वा, शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षकांची संख्या पुरेशी आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १४ (८२.३५%) विद्यालयाच्या प्राचार्यांनी सांगितले की, शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षकांची संख्या पुरेशी होती तर ३ (१७.६५%) विद्यालयाच्या प्राचार्यांनी सांगितले की शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षक संख्या पुरेशी नव्हती.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात ७ अध्यापक विद्यालयामध्ये शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षकांची संख्या पुरेशी होती. ही अनुदानित विद्यालये होती. तर १० विद्यालयामध्ये शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षकांची संख्या पुरेशी नव्हती. ही विद्यालये विनाअनुदानित होती. पगार कमी दिल्यामुळे शिक्षक टिकून रहात नव्हते.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य १० (५८.८२%) अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकांची संख्या कमी होती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने असमाधानकारक होती.

आजही प्राथमिक शिक्षण सर्व शिक्षणाचा पाया मानले जाते. प्राथमिक शिक्षण देण्याचे कार्य करणारे प्राथमिक शिक्षकच अध्यापक विद्यालयामध्ये तयार होतात. ते शिक्षक तयार करण्याचे कार्य अध्यापक विद्यालयांतील शिक्षकांचे आहे. त्या शिक्षकांचे प्रमाण कमी असल्यामुळे प्राथमिक शिक्षक योग्य तयार होणार नाहीत. ही उणीव टाळण्यासाठी सर्वच अध्यापक विद्यालयांमध्ये पुरेसे शिक्षक असावेत. त्यासाठी प्रशासनाने शिक्षक उपलब्ध करून द्यावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ३४वा, शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षकांची संख्या पुरेशी नसल्यास कोणत्या समस्या येतात ? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १४ (८२.३५%) विद्यालयामध्ये शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षकांची संख्या पुरेशी होती. त्यामुळे त्यांना कोणत्याच समस्या येत नव्हत्या. तर ३(१७.६५%) अध्यापक विद्यालयामध्ये शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षकांची संख्या पुरेशी नव्हती त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. शिक्षक कमी असल्यामुळे प्रत्येक शिक्षकाला जादा काम करावे लागत होते. जादा काम केल्यामुळे शिक्षकांना थकवा येतो. केलेले काम दर्जात्मक होत नाही. अभ्यास करण्यास वेळ मिळत नाही. पाठाचे निरीक्षण दोन किंवा तीन विद्यार्थ्यांचे करावे लागते. त्यामुळे पाठनिरीक्षण योग्य होत नाही. इत्यादी समस्या येत होत्या.

संशोधकाने १७ विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ७ विद्यालयांमध्ये शिक्षकांची संख्या पुरेशी होती. १० अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षकांची संख्या पुरेशी नसल्यामुळे जादा काम करावे लागत होते. जादा काम केल्यामुळे शिक्षकांना थकवा येत होता. केलेले काम दर्जात्मक होत नव्हते. अभ्यास करण्यास वेळ मिळत नव्हता. पाठाचे निरीक्षण दोन किंवा तीन विद्यार्थ्यांचे करावे लागत होते. त्यामुळे पाठनिरीक्षण योग्य होत नव्हते. इत्यादी समस्या येत होत्या.

यावरून १० (५८.८२%) विद्यालयांमध्ये शिक्षकांची संख्या पुरेशी नव्हती. म्हणून शिक्षकांना जादा काम करावे लागत होते. जादा काम केल्यामुळे शिक्षकांना थकवा येत होता. केलेले काम दर्जा त्मक होत नव्हते. अभ्यास करण्यास वेळ मिळत नव्हता. पाठाचे निरीक्षण दोन किंवा तीन विद्यार्थ्यांचे करावे लागत होते. त्यामुळे पाठनिरीक्षण योग्य होत नव्हते. ह्या समस्या येत होत्या.

वरील समस्या दूर करण्यासाठी शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षक असावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ३५वा, आवश्यक पात्रता धारण करणारे विषयशिक्षक आहेत काय? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १३ (७६.४७%) अध्यापक विद्यालयांमध्ये आवश्यक पात्रता धारण करणारे विषय शिक्षक होते. तर ४(२३.५३%)

अध्यापक विद्यालयांमध्ये आवश्यक पात्रता धारण करणारे विषय शिक्षक नव्हते. त्यामुळे त्यांच्या अध्यापनावर परिणाम होतो. खालील प्रमाणे अध्यापनावर परिणाम दिसून आला.

१. विषय वेगळा असल्यामुळे अध्यापन प्रभावी होत नाही. शिक्षकांना आपल्या अध्यापनात समस्या निर्माण होते.

२. विषय तज्ञ शिक्षकांचा अभाव परिणामी निकालाचे प्रमाण घसरते. विद्यालयाचा निकाल कमी लागतो.

३. क्वचित प्रसंगी बदली झाल्यास, शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठविल्यास अथवा शिक्षक दीर्घकाळाच्या रजेवर असल्यास दुसऱ्या शिक्षकांना तो विषय शिकवावा लागतो. त्यामुळे त्यांच्या अध्यापनाचा दर्जा ढासळतो.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील १३(७६.४७%) अध्यापक विद्यालयांमध्ये आवश्यक पात्रता धारण करणारे विषय शिक्षक होते. तर ४(२३.५३%) अध्यापक विद्यालयांमध्ये आवश्यक पात्रता धारण करणारे विषय शिक्षक नव्हते ही बाब चांगली नव्हती.

सर्व अध्यापक विद्यालयांमध्ये आवश्यक पात्रता धारण करणारे विषय शिक्षक असावेत असे संशोधकाला वाटते.

अध्यापनावरील वाईट परिणाम दूर करण्यासाठी सर्व अध्यापक विद्यालयांमध्ये आवश्यक पात्रता धारण करणारे विषय शिक्षकांची नियुक्ती करावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्र. ३६वा, एम.फिल व पी.एच.डी धारण करणारे शिक्षक किती आहेत? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांपैकी २(११.७६%) विद्यालयामध्ये एम.फिल धारण करणारे एक शिक्षक व पी.एच.डी धारण करणारे एक शिक्षक होते. तर १५(८८.२४%) अध्यापक विद्यालयामध्ये एम.फिल व पी.एच.डी धारण करणारे शिक्षक नव्हते.

यावरून सोलापूर जिल्ह्यात २(११.७६%) विद्यालयांमध्ये एम.फिल व पी.एच.डी धारण करणारे एक एक शिक्षक होते ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने अजिबात समाधानकारक नव्हती.

एम.फिल व पी.एच.डी शिवाय शिक्षकांमध्ये संशोधन दृष्टी निर्माण होणार नाही. त्यासाठी शिक्षकांनी एम.फिल व पी.एच.डी होणे आवश्यक असते. म्हणून एम.फिल व पी.एच.डी प्राप्त करण्यासाठी शासनाने व संस्थाचालकांनी प्रयत्न करावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ३७वा, शिक्षक आपल्या अध्यापनाचे टाचण काढतात का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.१२ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.१२**

**शिक्षकांच्या 'पाठ टाचणा' बाबतचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १४ | ८२.३५ |
| २. | नाही | ०३ | १७.६५ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१२ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी १४(८२.३५%) अध्यापक विद्यालयातील शिक्षकांनी पाठ टाचण तयार केले होते. ३ (१७.६५%) अध्यापक विद्यालयातील शिक्षकांनी पाठ टाचण तयार केले नव्हते असे सांगितले.

संशोधकाने प्रत्येक विद्यालयातील दोन शिक्षक याप्रमाणे १७ विद्यालयातील ३४ शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये अध्यापनाचे टाचण काढता का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली. १४(४१.१८%) शिक्षकांनी अध्यापनाचे टाचण तयार केले होते असे सांगितले तर २० (५८.८२%) शिक्षकांनी अध्यापनाचे टाचण तयार केले नव्हते असे सांगितले.


संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील सर्वच अध्यापक विद्यालयांना भेटी दिल्या. त्यात ५ विद्यालयातील शिक्षक अध्यापनाचे टाचण तयार करीत होते. ही विद्यालये अनुदानित होती. तर १२ विद्यालयातील शिक्षक अध्यपनाचे टाचण तयार करीत नव्हते असे दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य १२(७०.५८%) अध्यापक विद्यालयातील शिक्षक अध्यपनाचे टाचण तयार करीत नव्हते ही बाब समाधानकारक वाटत नाही. अध्यापक विद्यालयामधून

// आलेख क्र. - ८ //

को.क्र. ५.१३ अध्यापन निरीक्षणानुसार प्राचार्यांचे वर्गीकरण.

प्रमाण १ से.मी = १0%



असंख्य शिक्षक तयार होतात. शिक्षक तयार करणारा शिक्षक अध्यापनाचे टाचण तयार करत नसेल तर तो त्या पदास लायक नाही. रोज पाठ टाचण काढल्याने शिक्षकास काय शिकवायचे याची पूर्ण कल्पना येईल. त्याप्रमाणे शिक्षक पाठाची तयारी करून गेल्यास त्यांच्याकडून परिणामकारक अध्यापन घडेल. त्यासाठी सर्व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांनी अध्यापनाचे टाचण तयार करणे आवश्यक आहे असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३८ वा, एका शिक्षकाचे अध्यापनाचे महिन्यातून कितीवेळा निरीक्षण करता? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टकात दिली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.१३**

**अध्यापन निरीक्षणानुसार प्राचार्यांचे वर्गीकरण**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एकावेळी पाठ निरीक्षण करतो. | ०७ | ४१.१८ |
| २. | दोन वेळा पाठ निरीक्षण करतो. | ०१ | ०५.८८ |
| ३. | पाठ निरीक्षण केले जात नव्हते. | ०९ | ५२.९४ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१३ वरून असे दिसून येते की, ७(४१.१८%)विद्यालयातील प्राचार्य एका महिन्यातून एका पाठाचे निरीक्षण करीत होते. एका (५.८८%) विद्यालयातील प्राचार्य एका महिन्यातून दोन पाठाचे निरीक्षण करीत होते. तर ९(५२.९४%) विद्यालयातील प्राचार्य एका महिन्यातून एकाही पाठाचे निरीक्षण करीत नव्हते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये प्राचार्य अध्यापनाचे महिन्यातून किती वेळा निरीक्षण करतात ? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

१६(४७.०५%) शिक्षकांनी प्राचार्य अध्यापनाचे एका महिन्यातून एका पाठाचे निरीक्षण करीत होते असे सांगितले. १८(५२.९५%) शिक्षकांनी प्राचार्य अध्यापनाचे एका महिन्यातून एकाही पाठाचे निरीक्षण करीत नव्हते असे सांगितले.

संशोधकाने सर्व अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ५ विद्यालयातील प्राचार्य अध्यापनाचे महिन्यातून एका वेळी पाठाचे निरीक्षण करीत होते तर १२ विद्यालयातील प्राचार्य अध्यापनाचे महिन्यातून एकाही पाठाचे निरीक्षण करीत नव्हते हे दिसून आले. यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य १२ (७०.५८%) अध्यापक विद्यालयातील प्राचार्यांनी अध्यापनाचे निरीक्षण केले नव्हते. ही बाब समाधानकारक वाटत नाही.

प्राचार्यांनी शिक्षकाचे पाठ निरीक्षण केल्यामुळे दैनंदिन अध्यापन सुधारून प्रशिक्षक विद्यार्थ्यांचा विकास साधला जाईल. पाठ निरीक्षण करताना लोकशाही मार्गाचा अवलंब करावा. शिक्षकांना विश्वासात घेवून त्यांच्या चुका निदर्शनास आणून द्याव्यात व त्यांना मार्गदर्शन करावे. अध्यापकांच्या चांगल्या गोष्टींसाठी त्यांची प्रशंसा केली जावी. त्यांना प्रोत्साहन द्यावे. त्यामुळे शिक्षक आपल्या अध्यापनाचे काम अधिक कार्यक्षमतेने करतील. त्यासाठी पाठ निरीक्षण सर्व अध्यापक विद्यालयातून व्हावे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.३९वा, शिक्षक शैक्षणिक साधनांचा उपयोग करतात काय? असा प्रश्न विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १७ पैकी १६ (९४.१२%) प्राचार्यांनी त्यांच्या अध्यापक विद्यालयातील शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करतात असे सांगितले. तर एका(५.८८%) प्राचार्यांनी त्यांच्या अध्यापक विद्यालयातील शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करीत नव्हते असे सांगितले.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये शैक्षणिक साधनांचा उपयोग केला जातो का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

१३(३८.२३%) शिक्षकांनी शैक्षणिक साधनांचा उपयोग केला होता असे सांगितले. तर २१ (६१.७७%) शिक्षकांनी शैक्षणिक साधनांचा उपयोग केला नव्हता असे सांगितले.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ६ विद्यालयातील शिक्षक शैक्षणिक साधनांचा उपयोग करीत होते. तर ११ विद्यालयातील शिक्षक शैक्षणिक साधनांचा उपयोग करीत नव्हते हे दिसून आले.

यावरून ६(३५.३०%) अध्यापक विद्यालयातील शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करीत होते तर ११(६४.७०%) अध्यापक विद्यालयातील शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करीत नव्हते ही बाब समाधानकारक वाटत नाही. शैक्षणिक साधनांचा वापर केल्यामुळे घटकातील संकल्पना संबोध स्पष्ट करण्यास मदत होते. त्या हेतूने शिक्षकांनी शैक्षणिक साधनांचा वापर करणे गरजेचे आहे. अध्यापन प्रभावी आनंददायी आणि विद्यार्थ्यांचे अवधान टिकवून ठेवण्यासाठी शैक्षणिक साधनांचा वापर करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व प्राचार्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करून शैक्षणिक साधने वापरण्यास लावावीत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.४०वा, अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण केला जातो का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण करणा-या अध्यापक विद्यालयांचे प्रमाण १४(८२.३५%) होते. तर अभ्यासक्रम वर्षभरात न पूर्ण करणा-या अध्यापक विद्यालयांचे प्रमाण ३(१७.६५%) होते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण केला जातो का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२४ (७०.५८%) शिक्षकांनी अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण केला होता असे सांगितले तर १०(२९.४२%) शिक्षकांनी अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण केला नव्हता असे सांगितले.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर चर्चा केली. त्यावेळेस ९ अध्यापक विद्यालयामध्येच वर्षभरात अभ्यासक्रम पूर्ण केला होता असे आढळून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य ९(५२.९४%) अध्यापक विद्यालयातील अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण केला जात होता ही बाब समाधानकारक वाटत नाही. शिक्षक सक्षम होतील व विद्यार्थ्यांचा विकास साधेल यासाठी सर्व अध्यापक विद्यालयातील अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण करावा असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्र.४१वा, अभ्यासक्रम न पूर्ण झाल्यास कोणते उपाय करता? असा विचारला होता. प्रतिसादक प्राप्त झालेली माहिती अशी की, १४(८२.३५%) विद्यालयातील अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण केला होता. त्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी कोणतेच उपाय केले नव्हते. तर ३ (१७.६५%)

विद्यालयातील अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण केला नव्हता. त्यामुळे जादा तास, स्वयंअध्ययन इत्यादी उपाय करीत होतो असे सांगितले.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर चर्चा केली. त्यावेळेस अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी कोणतेच उपाय केले जात नव्हते असे आढळून आले.

यावरून ८(४७.०६%) अध्यापक विद्यालयामध्ये अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी कोणतेच उपाय केले जात नव्हते ही गोष्ट फारच वाईट होती. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विविध उपाय करावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्र.४२वा, सर्व शिक्षक विद्यालयाच्या ठिकाणीच राहतात का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, ७(४१.१८%) प्राचार्यांनी सांगितले की, त्यांच्या विद्यालयातील सर्व शिक्षक विद्यालयाच्या आसपास गावातच राहत होते तर १0(५८.८२%) विद्यालयामधील शिक्षक विद्यालयाच्या आसपास गावात रहात नव्हते.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ७ विद्यालयांमधील शिक्षक विद्यालयाच्या आसपास गावात रहात होते तर १0 विद्यालयातील शिक्षक विद्यालयाच्या आसपास गावात रहात नव्हते असे दिसून आले.

यावरून १0 (५८.८२%) विद्यालयामध्ये शिक्षक विद्यालयाच्या आसपास गावात रहात नव्हते. शिक्षक मुख्यालयात रहातील तर विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर होतील. विद्यालयासाठी जादा वेळ देऊ शकतील. समाजात त्यांच्या बद्दल आपुलकी राहील व समाज-शिक्षक यांच्यात आंतरक्रिया होत राहील. पण शिक्षक तेथे रहात नसल्याने हे फायदे मिळणार नाहीत. ही स्थिती असमाधानकारक वाटते.

जे शिक्षक विद्यालयाच्या ठिकाणी रहात नाहीत त्यांना प्राचार्यांनी विद्यालयाच्या ठिकाणी रहाण्याचे महत्व पटवून द्यावे. प्राचार्यांनी व समाजाने मिळून शिक्षकांच्याही अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करावा. शिक्षक बाहेरगावी रहात असल्यामुळे विद्यालयात वेळेवर हजर होत नाहीत. शिक्षकांच्या म्हणण्यानुसार त्या ठिकाणी खोल्या उपलब्ध नाहीत असे सांगतात. त्यासाठी शासनाने व संस्थाचालकांनी शिक्षकांसाठी निवासस्थान बांधून द्यावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ४३वा, शिक्षक विद्यालयाच्या ठिकाणी रहात नसल्यास कोणत्या समस्या येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, ७(४१.१८%) विद्यालयातील शिक्षक विद्यालयाच्या ठिकाणी रहात असल्यामुळे त्या विद्यालयांना समस्या येत नव्हत्या. तर १०(५८.८२%) विद्यालयातील शिक्षक परगावी रहात होते म्हणून त्यांना विविध समस्या येत होत्या. त्यातील ६(३५.३०%) प्राचार्यांनी हे शिक्षक वारंवार शाळेला उशीरा येतात. जादा तासाला हजर राहू शकत नाहीत. रात्रीचे तास घेण्यास अभ्यासिकेसाठी थांबत नाहीत. हे शिक्षक शालेय कार्यक्रमाला वेळेवर हजर राहू शकत नाहीत. शाळेतही उशीरापर्यंत थांबत नाहीत इत्यादी समस्या येतात असे सांगितले. ४ (२३.५२%) प्राचार्यांनी परगावी राहणाऱ्या शिक्षकांमुळे कोणत्याही समस्या निर्माण होत नाहीत असे सांगितले.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात ७ विद्यालयातील शिक्षक विद्यालयातील शिक्षक विद्यालयाच्या ठिकाणी रहात होते. त्यामुळे त्या विद्यालयांना कोणत्याच समस्या येत नव्हत्या तर १० विद्यालयातील शिक्षक विद्यालयाच्या ठिकाणी रहात नव्हते. मन:पूर्वक विद्यालयात काम न करणे, शाळेत वेळेवर न येणे, जादा तास न घेणे, अभ्यासोत्तर उपक्रमास गैरहजर रहाणे, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष न देणे इत्यादी समस्या निर्माण होतात असे दिसून आले.

यावरून बहुसंख्य १० (५८.८२%) विद्यालयांना मन:पूर्वक विद्यालयात काम न करणे, वेळेवर शाळेत न येणे, जादा तास न घेणे, अभ्यासोत्तर उपक्रमास गैरहजर रहाणे, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष न देणे इत्यादी समस्या येत होत्या. ही गोष्ट फारच वाईट होती. विविध समस्या दूर करण्यासाठी शिक्षकांचा सहभाग वाढवावा. त्यासाठी सर्व शिक्षकांनी विद्यालयाच्या ठिकाणीच रहाणे प्रशासनाच्या दृष्टीने चांगले आहे असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्र.४४वा, शिक्षकांची दरमहा मासिक सभा घेतली जाते का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १२(७०.५८%) विद्यालयामध्ये शिक्षकांची दरमहा मासिक सभा घेतली होती तर ५(२९.४२%) विद्यालयामध्ये शिक्षकांची दरमहा मासिक सभा घेतली नव्हती.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये दरमहा मासिक सभा घेतली जाते का? असा प्रश्न विचारला होता त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली. १९(५५.८८%) शिक्षकांनी सांगितले की दरमहा मासिक सभा घेतली जाते तर १५(४४.१२%) शिक्षकांनी सांगितले की दरमहा मासिक सभा घेतली जात नव्हती.

यावरून बहुसंख्य ९(५२.९४%) विद्यालयामध्ये शिक्षकांची दरमहा मासिक सभा घेतले होते. ही बाब समाधानकारक वाटत नाही. शिक्षकांच्या मासिक सभेमुळे शिक्षक-प्राचार्य यांच्यात आंतरक्रिया वाढते. कांही व्यावसायिक अडचणी सुटल्या/सोडविल्या जातात. अभ्यासक्रम व इतर प्रशासकीय कामांचा अढावा घेतला जातो व पुढील महिन्यासाठीचे नियोजन करता येते तसेच प्राचार्य शिक्षकांना मार्गदर्शन करू शकतील. त्यासाठी सर्व विद्यालयांमध्ये शिक्षकांच्या दरमहा मासिक सभा घ्याव्यात असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्र.४५वा, मासिक सभेमध्ये कोणकोणत्या बाबींचा अढावा घेतला जातो? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र.५.१४ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.१४**
**मासिक सभेतील चर्चेचे वर्गीकरण.**

| अ.क्र | चर्चेचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | परिपत्रक वाचन | ११ | ६४.७० |
| २ | दैनंदिन अध्यापन | १५ | ८८.२३ |
| ३ | सांस्कृतिक कार्यक्रम | १५ | ८८.२३ |
| ४ | विद्यार्थ्यांना मार्गदर्शन | १४ | ८२.३५ |

टीप :- प्रत्येक प्राचार्याने विद्यालयामध्ये एकापेक्षा अधिक विषयांसंबंधित चर्चा केली जाते असे प्रश्नावलीत नमूद केलेले आहे. त्यामुळे एकूण संख्या १७ पेक्षा अधिक आली आहे.

वरील कोष्टक क्रमांक ५.१४ वरून असे दिसून येते की, ११(६४.७०%) अध्यापक विद्यालयाच्या मासिक सभेमध्ये परिपत्रकाचे वाचन केले होते. प्रत्येकी १५(८८.२३%) अध्यापक विद्यालयाच्या मासिक सभेमध्ये दैनंदिन अध्यापन व सांस्कृतिक कार्यक्रमाबाबत चर्चा केली होती.

१४(८२.३५%) अध्यापक विद्यालयाच्या मासिक सभेमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासंबंधी चर्चा केली होती.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य(८०.८८%) अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकांच्या मासिक सभेत परिपत्रक वाचन, दैनंदिन अध्यापन, सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांना मार्गदर्शन इत्यादी संबंधित चर्चा केली होती. सर्वच अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकांच्या मासिक सभेत विविध विषयासंबंधित चर्चा करण्यात यावी असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्र.४६वा, सेवांतर्गत प्रशिक्षणास शिक्षकांना पाठविले जाते का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी १५ (८८.२३%) अध्यापक विद्यालयामधील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविले होते तर २ (११.७७%) अध्यापक विद्यालयामधील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविले नव्हते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये सेवांतर्गत प्रशिक्षणास पाठविले जाते का? अशा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली. २२ (६४.७०%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविले होते. तर १२ (३५.३०%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविले नव्हते.


यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य ११ (६४.७०%) अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविले जात होते. ही चांगली गोष्ट आहे. शिक्षकांना प्रशिक्षणास पाठविल्यामुळे त्यांना नविन संबोध, संकल्पना, पद्धती, धोरण याची माहिती मिळते व शिक्षकांचे स्वत:चेही ज्ञान वाढते. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होतो. शिक्षकांना प्रभावी अध्यापनासाठी प्रशिक्षणाचा चांगला उपयोग होतो. त्यासाठी सर्वच अध्यापक विद्यालयांनी शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठवावे असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्र.४७वा, शिक्षकांना कोणकोणत्या प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात ? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.१५ मध्ये देण्यात आली आहे.

// आलेख क्र. - ९ //

**को.क्र.५.१५ सेवांतर्गत प्रशिक्षणानुसार वर्गीकरण.**

प्रमाण १ से.मी. = १०%



**कोष्टक क्रमांक ५.१५**

**सेवांतर्गत प्रशिक्षणानुसार वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रशिक्षणाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सेवांतर्गत प्रशिक्षण. | १५ | ८८.२३ |
| २ | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे प्रशिक्षण. | १४ | ८२.३५ |
| ३ | राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे प्रशिक्षण. | ०९ | ५२.९४ |

टिप :- प्रत्येक प्राचार्यांनि विद्यालयामध्ये एकापेक्षा अधिक प्रशिक्षणासाठी शिक्षकांना पाठविले होते असे प्रश्नावलीत नमूद केलेले आहे. त्यामुळे एकूण संख्या १७ पेक्षा अधिक आली आहे.

वरील कोष्टक क्रमांक ५.१५ वरून असे दिसून येते की, १५(८८.२३%) अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविले होते. १४(८२.३५%) अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकांना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या प्रशिक्षणासाठी पाठविले होते. तर ९(५२.९४%) अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकांना राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या प्रशिक्षणासाठी पाठविले होते. या सर्व प्रशिक्षण संधी खात्याकडून उपलब्ध करून दिल्या होत्या.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे प्रशिक्षणासाठी पाठविले जात होते. ही चांगली गोष्ट आहे. सर्वच अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना विविध प्रशिक्षणासाठी पाठवावे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.४८वा, प्रशिक्षणास शिक्षकांचा प्रतिसाद कसा मिळतो? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र.५.१६ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.१६**

**प्रशिक्षणास शिक्षकांच्या प्रतिसादाचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | चांगला | ११ | ६४.७० |
| २ | उत्कृष्ट | ०४ | २३.५३ |
| ३ | नाही | ०२ | ११.७७ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१६ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ११(६४.७०%) अध्यापक विद्यालयातील शिक्षकांचा प्रशिक्षणास चांगला प्रतिसाद होता. ४(२३.५३%) अध्यापक विद्यालयामधील शिक्षकांचा प्रशिक्षणास उत्कृष्ट प्रतिसाद होता. तर २ (११.७७%) अध्यापक विद्यालयामधील शिक्षकांना प्रशिक्षणास पाठविले नव्हते. त्यामुळे प्राचार्यांनी प्रतिसाद व्यक्त केला नाही.

यावरून ११(६४.७०%) अध्यापक विद्यालयातील शिक्षकांचा प्रशिक्षणास चांगला प्रतिसाद होता. ४(२३.५३%) अध्यापक विद्यालयामधील शिक्षकांचा प्रशिक्षणास उत्कृष्ट प्रतिसाद होता. ही बाब समाधानकारक होती. सर्वच अध्यापक विद्यालयातील शिक्षकांचा प्रशिक्षणास उत्कृष्ट प्रतिसाद असावा असे संशोधकाला वाटते.

प्रश्न ४९वा, शिक्षक सराव पाठ सुरू होण्यापूर्वी दिग्दर्शित पाठ घेवून दाखवितात का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ (१००%) अध्यापक विद्यालयातील शिक्षक सराव पाठ सुरू होण्यापूर्वी दिग्दर्शित पाठ घेवून दाखवित होते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये सराव पाठ सुरू होण्यापूर्वी दिग्दर्शित पाठ घेवून दाखवितात का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळेस त्यांनी पुढील उत्तरे दिली.

३४(१००%) शिक्षकांनी सांगितले की, सराव पाठ सुरू होण्यापूर्वी दिग्दर्शित पाठ घेवून दाखविले होते.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील १००% अध्यापक विद्यालयातील शिक्षक सराव पाठ सुरू होण्यापूर्वी दिग्दर्शित पाठ घेवून दाखवित होते. दिग्दर्शित पाठ घेवून दाखविल्यामुळे सराव पाठासाठी जी उपयुक्त कौशल्ये आहेत त्यांची कल्पना प्रशिक्षकास येईल. त्या विविध कौशल्याच्या आधारे प्रशिक्षक सराव पाठ घेण्यामध्ये यशस्वी होतील असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.५०वा, दिग्दर्शित पाठाचे व्ही.डी.ओ शूटींग काढले जाते का? असा प्रश्न विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी १७(१००%) विद्यालयामध्ये दिग्दर्शित पाठाचे व्ही.डी.ओ चित्रीकरण केले जात नव्हते असे प्रतिसादक प्राचार्यांनी सांगितले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील कोणत्याही अध्यापक विद्यालयामध्ये दिग्दर्शित पाठाचे चित्रीकरण केले जात नव्हते. ही बाब समाधानकारक वाटत नाही. दिग्दर्शित पाठाचे व्ही.डी.ओ चित्रीकरणाचा विद्यार्थ्यास मार्गदर्शनासाठी उपयोग होतो तसेच आदर्श म्हणून उपयोग होतो. यासाठी व्ही.डी.ओ चित्रीकरणाचे साहित्य खरेदी करण्यासाठी शासनाने किंवा संस्था चालकांनी निधी उपलब्ध करून द्यावेत. सर्वच अध्यापक विद्यालयामध्ये दिग्दर्शित पाठाचे व्ही.डी.ओ चित्रीकरण करावे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.५१वा, त्याचा विद्यार्थ्यांना कोणता उपयोग होतो? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेल्या महितीनुसार सोलापूर जिल्ह्यातील कोणत्याही अध्यापक विद्यालयात दिग्दर्शित पाठाचे व्ही.डी.ओ चित्रीकरण केले जात नव्हते. त्यामुळे त्याचा विद्यार्थ्यांना कोणता उपयोग होतो यासंबंधी प्रतिसादक प्राचार्यांनी व्ही.डी.ओ चित्रीकरणाचे उपयोग सांगितले नाहीत.

### इ. शिक्षकेतर कर्मचा-यांविषयी माहिती :-

प्राचार्याच्या प्रश्नावलीतील या विभागात अध्यापक विद्यालयाच्या शिक्षकेतर कर्मचा-यांविषयी प्रश्न विचारले होते. प्रश्न क्र.५२ ते ५४ असे तीन प्रश्न विचारले होते.

प्रशासनाचा महत्वाचा घटक म्हणजे शिक्षकेतर कर्मचारी. या वर्गावरच त्या विद्यालयाची गुणवत्ता अवलंबून असते. म्हणून प्रश्न क्र.५२वा, आपल्या विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे आहेत का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र.५.१७ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.१७**

**विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी प्रमाणांचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कर्मचारी पुरेसे आहेत. | ०७ | ४१.१८ |
| २ | कर्मचारी पुरेसे नाहीत. | ०८ | ४७.०६ |
| ३ | कर्मचारी अजिबात नाहीत. | ०२ | ११.७६ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्र.५.१७ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांपैकी ७(४१.१८%) विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे होते. ८(४७.०६%) विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे नव्हते तर २(११.७६%) विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी अजिबात नव्हते. ही विद्यालय विनाअनुदानित होती.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ७ अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी होते तर ६ विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे नव्हते. ४ विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी अजिबात नव्हते असे दिसून आले. ही विद्यालये विनाअनुदानित असल्यामुळे संस्थाचालकांनी पुरेसा कर्मचारी वर्ग भरलेला नव्हता.

यावरून ७ अनुदानित अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी पूरेसे होते. तर १0 विनाअनुदानित विद्यालयांपैकी ६ विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी अपुरे होते.४ विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी अजिबात नव्हते. ही गोष्ट फारच वाईट होती. विनाअनुदानित विद्यालयामधील शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे भरावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.५३वा, शिक्षकेतर कर्मचारी नसल्यास कोणत्या अडचणी येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, ७(४१.१८%) विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे होते. त्यामुळे त्यांना कोणत्याच प्रकारची समस्या येत नव्हत्या. तर ८(४७.०६%) विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे नव्हते. २ (११.७६%) विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी अजिबात नव्हते. त्यामुळे या दहा विद्यालयांना विविध समस्या येत होत्या. त्यामध्ये वर्ग स्वच्छता, तासिका, घंटा वाजविणे, विज्ञान शाळेतील साहित्यांची मांडणी इत्यादी बाबतीत समस्या येत होत्या.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ७ अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे होते. म्हणून त्यांना कोणत्याच अडचणी येत नव्हत्या. तर १0 अध्यापक विद्यालयापैकी ६ विद्यालयामध्ये कर्मचारी पुरेसे नव्हते तर ४ विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी अजिबात नव्हते. म्हणून या १0 विद्यालयांना वर्ग स्वच्छता, तासिका, घंटा वाजविणे, प्रयोग साहित्यांची मांडणी इत्यादी बाबतीत समस्या येत होत्या असे दिसून आले.

यावरून १0 (५८.८२%) विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांना वर्ग स्वच्छता, तासिका, घंटा वाजविणे, प्रयोग साहित्याची मांडणी इत्यादी समस्या येत होत्या. सर्वच अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे असावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.५४वा, शिक्षकेतर कर्मचा-यांचा अध्यापनावर कोणता परिणाम होतो? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, ८(४७.0६%) विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचा-यांचा अध्यापनावर चांगला परिणाम होतो असे सांगितले तर ९(५२.९४%) विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचा-यांचा अध्यापनावर कोणताच परिणाम होत नव्हता असे सांगितले.

यावरून ८ विद्यालयामध्ये पुरशा शिक्षकेतर कर्मचा-यांचा अध्यापनावर चांगला परिणाम होतो तर ९ विद्यालयामध्ये शिक्षकेतर कर्मचा-यांचा अध्यापनावर परिणाम होत नव्हता. ही बाब समाधानकारक वाटत नाही. सर्वच अध्यापक विद्यालयामध्ये पुरेसे कर्मचारी असतील तर त्यांचा अध्यापनावर चांगला परिणाम होईल असे संशोधकाला वाटते.

ई. विद्यार्थी प्रशासनाविषयी माहिती.

प्राथमिक शिक्षणासंबंधी भारतीय घटनेत ४५ कलमानुसार कायदा करण्यात आला. परंतु त्याची अम्मलबजावणी झाली नाही. त्यासाठी अनेक वेळा मुदत वाढवून घेण्यात आली. त्यावर समित्या नेमल्या आणि त्या समित्यांनी सुचविलेले उपाय त्यावर योजले. तरीही २000 पर्यंतची मुदत वाढवून २00५ ही करावी लागली. हे मोफत सक्तीचे शिक्षण १00% पट नोंदणी हे ध्येय गाठू शकले नाही. प्राथमिक शिक्षणाचा कायदा करून चालणार नाही तर त्यासाठी समाजामध्ये जागृती निर्माण झाली पाहिजे. ग्रामीण भागातील मुलांना प्राथमिक शिक्षणाच्या सोयी करून दिल्या पाहिजेत. प्राथमिक शिक्षणामध्ये शिक्षकांचे कार्य मोलाचे आहे. प्राथमिक शिक्षक हे अध्यापक विद्यालयामध्ये तयार होतात. या अध्यापक विद्यालयामधील प्रशिक्षक विद्यार्थी हा महत्वाचा घटक आहे. यासाठी विद्यार्थी प्रशासनाविषयी माहिती या विभागात प्रश्न क्र.५५ ते ७२ असे एकूण १८ प्रश्न विचारले होते.


या विभागातील प्रश्न क्र.५५वा, प्रथम वर्षाला जी प्रवेश प्रक्रिया राबविली जाते तिचे स्वरूप काय आहे? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सन २000 पासून संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या मार्फत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेनुसार डी.एड प्रथम वर्षासाठी प्रवेश दिला जातो. म्हणजेच केंद्रिय पद्धतीनुसार डी.एड प्रथमवर्षासाठी विद्यार्थ्यांची निवड केली जाते. अशी सर्व अध्यापक विद्यालयांच्या प्राचार्यांकडून माहिती मिळाली.

प्रश्न क्र.५६वा, अध्यापक विद्यालय उशीरा सुरू झाल्यानंतर अभ्यासक्रम कसा पूर्ण केला जातो? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र.५.१८ मध्ये देण्यात आली आहे.

// आलेख क्र. - १० //

को.क्र. ५.१८ विद्यालयातील अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या प्रयत्नांचे वर्गीकरण.

प्रमाण. १ से.मी = १०%



**कोष्टक क्रमांक ५.१८**
**विद्यालयातील अभ्यासक्रम पूर्ण करणा-या प्रयत्नांचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शासनाचे नियम व स्थानिक नियोजनानुसार अभ्यासक्रम पूर्ण करतो. | ०५ | २९.४२ |
| २ | जादा तास घेवून अभ्यासक्रम पूर्ण करतो. | १० | ५८.८२ |
| ३ | स्वयंअध्ययन पद्धतीने अभ्यासक्रम पूर्ण करतो. | ०२ | ११.७६ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्र.५.१८ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ५(२९.४२%) विद्यालयामध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे भरणारे दिवस व स्थानिक नियोजनानुसार अभ्यासक्रम पूर्ण केले होते. १०(५८.८२%) विद्यालयमध्ये जादा तास घेवून अभ्यासक्रम पूर्ण केले होते. २(११.७६%) विद्यालयामध्ये स्वयंअध्ययन पद्धतीने अभ्यासक्रम पूर्ण केले जात होते. यावरून १०(५८.८२%) विद्यालयामध्ये जादा तास घेवून अभ्यासक्रम पूर्ण केले होते. ही बाब समाधानकारक वाटते. सर्व अध्यापक विद्यालयामध्ये अभ्यासक्रम पूर्ण करावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.५७वा, गैरहजर विद्यार्थ्यांविषयी कोणती उपाययोजना केली जाते? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.१९ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.१९**
**गैरहजर विद्यार्थ्याविषयी उपायांचे वर्गीकरण.**

| अ.क्र | उपायांचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पालकांना बोलाविले जाते. | १५ | ८८.२३ |
| २. | दंड घेतला जातो. | ०८ | ४७.०६ |
| ३. | जादा अभ्यास करून घेतला जातो. | ०६ | ३५.३० |
| ४. | विद्यार्थी उशीरा येण्याचे कारण जाणून घेतले जाते | ०२ | ११.७६ |

टीप :- प्रत्येक प्राचार्यांनि विद्यालयामध्ये एकापेक्षा अधिक उपाय गैरहजर विद्यार्थ्यांसाठी केले होते असे प्रश्नावलीत नमूद केलेले आहे. त्यामुळे एकूण संख्या १७ पेक्षा अधिक आली आहे.

वरील कोष्टक क्रमांक ५.१९ वरून असे दिसून येते की, १५(८८.२३%) विद्यालयामध्ये गैरहजर विद्यार्थ्यांविषयी त्यांच्या पालकांना बोलाविले होते. ८(४७.०६%) विद्यालयामध्ये गैरहजर विद्यार्थ्यांकडून पैशाच्या रूपाने दंड घेतला होता. ६(३५.३०%) विद्यालयामध्ये गैरहजर विद्यार्थ्यांकडून जादा अभ्यास करून घेतला होता. २(११.७६%) विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे गैरहजर राहण्याचे कारण जाणून घेतले होते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये गैरहजर विद्यार्थ्यांविषयी कोणती उपाय योजना केली जाते? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२०(५८.८२%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की गैरहजर विद्यार्थ्यांविषयी त्यांच्या पालकांना बोलाविले जात होते. १४(४१.१८%) प्रतिसादक शिक्षकांनी गैरहजर विद्यार्थ्यांकडून जादा अभ्यास करून घेतला जात होता असे सांगितले.

यावरून बहुसंख्य(८८.२३%) अध्यापक विद्यालयातील गैरहजर विद्यार्थ्यांना समज देण्यासाठी त्यांच्या पालकांना बोलावले जाते. ८(४७.०६%) अध्यापक विद्यालयांचे प्राचार्य त्यांना दंड करतात तर ६(३५.३०%) विद्यालये जादा अभ्यास करून घेतात. पालकांना बोलावून घेवून समज देणे, दंड करणे हे उपाय अनेक प्राचार्य योजत होते. ही गोष्ट योग्य वाटते. विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेवून त्यास विद्यालयात वेळेवर का यावे हे समजावून सांगावे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ५८वा, सूक्ष्म अध्यापन पाठाची संख्या पुरेशी आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १७(१००%) अध्यापक विद्यालयामध्ये सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या पुरेशी होती असे प्राचार्यांनी सांगितले.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या पुरेशी आहे का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२०(५८.८२%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या पुरेशी होती तर १४(४१.१८%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या पुरेशी नव्हती.

यावरून बहुसंख्य १०(५८.८२%) अध्यापक विद्यालयांमध्ये सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या पुरेशी होती. ही बाब समाधानकारक होती. सूक्ष्म अध्यापन पाठाची वेळ पाच मिनिटांहून सात मिनिटांवर करावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ५९वा, सूक्ष्म अध्यापनाचे पाठ पुरेसे नसल्यास कोणत्या अडचणी येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १७(१००%) अध्यपाक विद्यालयामध्ये सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या पुरेशी होती. त्यामुळे त्यांना कोणत्याच प्रकारच्या अडचणी येत नव्हत्या असे सांगितले. प्राचार्य खरी माहिती लपवित होते असे आढळून आले.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये सूक्ष्म अध्यापनाचे पाठ पुरेसे नसल्यास कोणत्या अडचणी येतात? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२०(५८.८२%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या पुरेशी होती. म्हणून कोणत्याच अडचणी येत नव्हत्या. तर १४(४१.१८%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या पुरेशी नव्हती. त्यांना चेतक बदल, प्रबलन, फलक लेखन, विषय विवेचन इत्यादी कौशल्यामध्ये अडचणी येतात असे सांगितले.

यावरून १०(५८.८२%) अध्यापक विद्यालयामध्ये सूक्ष्म अध्यापन पाठामध्ये अडचणी येत नव्हत्या तर ७(४१.१८%) विद्यालयामध्ये सूक्ष्म पाठांची संख्या पुरेशी नव्हती म्हणून चेतक बदल, प्रबलन, फलक लेखन, विषय विवेचन इत्यादी कौशल्यामध्ये अडचणी येत होत्या. सूक्ष्म अध्यापनामध्ये कौशल्य जास्त आहेत. मर्यादित पाठांच्या संख्येमध्ये सर्व कौशल्यांचा उहापोह करता येत नाही. त्यासाठी सूक्ष्म अध्यापन पाठांच्या संख्येत वाढ करण्यात यावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ६०वा, सराव पाठांची संख्या पुरेशी आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.२० मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.२०**

**सराव पाठांची संख्या पुरेशी सांगणा-या प्राचार्यांचे वर्गीकरण**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सराव पाठांची संख्या पुरेशी आहे. | 0९ | ५२.९४ |
| २ | प्रथम वर्षासाठी सराव पाठाची संख्या पुरेशी नाही. | 0५ | २९.४१ |
| ३ | सराव पाठांची संख्या वाढवावी. | 0३ | १७.६५ |
| | एकूण | १७ | १00.00 |

वरील कोष्टक क्रमांक ५.२0 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ विद्यालयापैकी ९(५२.९४%) विद्यालयाचे प्राचार्य सराव पाठांची संख्या पुरेशी हाती तर ५(२९.४१%) विद्यालयाचे प्राचार्य प्रथम वर्षासाठी सराव पाठांची संख्या पुरेशी नव्हती असे सांगत होते. ३(१७.६५%) विद्यालयाचे प्राचार्य सराव पाठांची संख्या वाढवावी असे सांगत होते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये सराव पाठांची संख्या पुरेशी आहे का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढीलप्रमाणे उत्तरे दिली. १८(९२.९४%) प्रतिसादक शिक्षक सराव पाठांची संख्या पुरेशी होती असे सांगत होते. १0(२९.४१%) प्रतिसादक शिक्षक प्रथमवर्षासाठी सराव पाठांची संख्या पुरेशी नव्हती असे सांगत होते. ६(१७.६५%) प्रतिसादक शिक्षक सराव पाठांची संख्या वाढवावी असे सांगत होते.

यावरून ५२.९४% विद्यालयातील प्राचार्यांनी सराव पाठांची संख्या पुरेशी होती असे कबूल केले. तर २९.४१% प्राचार्यांनी प्रथम वर्षासाठी सराव पाठांची संख्या पुरेशी नव्हती असे सांगितले. १७.६५% प्राचार्यांनी सराव पाठांची संख्या वाढवावी असे सांगितले. पाठ संख्या पुरेशी नव्हती, ती वाढवावी हे शिक्षकांच्या मुलाखतीमधून दिसून आले. ही गोष्ट चांगली होती. भाषेचा उच्चार, सभाधीटपणा, वर्गनियंत्रण, आत्मविश्वासाचा अभाव इत्यादी सराव पाठातील कमतरता विद्यार्थ्यांमधील दूर करण्यासाठी प्रथम वर्षासाठी सराव पाठांची संख्या वाढवावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ६१वा, सराव पाठामध्ये विद्यार्थ्यांच्या कोणत्या कमतरता दिसून येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.२१ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.२१**

**सराव पाठातील विद्यार्थ्यांच्या कमतरतेचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सराव पाठातील कमतरता दिसून येतात. | १० | ५८.८२ |
| २ | सराव पाठातील कमतरता दिसून येत नाहीत. | ०७ | ४१.१८ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२१ वरून असे दिसून येते की, १०(५८.८२%) विद्यालयातील प्राचार्यांनी सराव पाठामध्ये कमतरता दिसून येत होती असे सांगितले तर ७(४१.१८%) विद्यालयातील प्राचार्यांनी सराव पाठामध्ये त्रुटया नव्हत्या असे सांगितले.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये सराव पाठामध्ये विद्यार्थ्यांच्या कोणत्या कमतरता दिसून येतात? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.


१८(५२.९४%) प्रतिसादक शिक्षकांनी भाषेचा शुद्ध उच्चाराचा अभाव, आत्मविश्वासाचा अभाव, शैक्षणिक साधनांचा कमी वापर, सभाधीटपणा, वर्ग नियंत्रण, फलक लेखन, पाठटाचणामधील त्रुटी इत्यादी सराव पाठातील कमतरता विद्यार्थ्यांमध्ये दिसून आल्याचे सांगितले. तर १६(४७.०६%) प्रतिसादक शिक्षकांनी सरावपाठामध्ये विद्यार्थ्यांच्या कमतरता दिसून येत नव्हत्या असे सांगितले.

यावरून ५८.८२% विद्यालयातील प्राचार्यांनी सराव पाठात कमतरता असतात असे कबूल केले तर ४१.१८% प्राचार्यांनी त्रुटी नसतात असे सांगितले. पण बहुतांश सराव पाठामध्ये त्रुटी राहतात हे शिक्षकांच्या मुलाखतीमधून दिसून आले.

सराव पाठातील कमतरता दूर करण्यासाठी सर्व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांनी प्रयत्न करावेत असे संशोधकाला वाटते.

// आलेख क्र. - ११ //

**को.क्र. ५.२२ सराव पाठातील कमतरता कमी करण्याचे वर्गीकरण.**



प्रश्न क्रमांक ६२वा, सराव पाठातील कमतरता कमी करण्यासाठी आपण काय करता? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.२२ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.२२**

**सराव पाठातील कमतरता कमी करण्याचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मार्गदर्शन केले जाते. | ११ | ६४.७० |
| २ | जादा तास. | १० | ५८.८२ |
| ३ | शैक्षणिक साहित्य तयार करून घेतले जाते. | १२ | ७०.५८ |
| ४ | पाठ परत घेतला जातो. | ०८ | ४७.०६ |

टीप :- प्रत्येक प्राचार्यानि विद्यालयामध्ये एकापेक्षा अधिक प्रयत्न करून विद्यार्थ्यांमधील सरावपाठातील कमतरता दूर करत होते असे प्रश्नावलीत नमूद केलेले आहे. त्यामुळे एकूण संख्या १७ पेक्षा अधिक आली आहे.

वरील कोष्टक क्रमांक ५.२२ वरून असे दिसून येते की, ११(६४.७०%) विद्यालयामध्ये सराव पाठातील कमतरता कमी करण्यासाठी मार्गदर्शन केले होते. १०(५८.८२%) विद्यालयामध्ये सराव पाठातील कमतरता दूर करण्यासाठी जादा तास घेतले होते. १२ (७०.५८%) विद्यालयामध्ये सराव पाठातील कमतरता दूर करण्यासाठी शैक्षणिक साहित्य तयार करून घेतले होते. ८(४७.०६%) विद्यालयामध्ये सराव पाठातील कमतरता दूर करण्यासाठी पाठ परत घेतला जात होता.


यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुतांश अध्यापक विद्यालयामध्ये सराव पाठातील कमतरता कमी करण्याचे प्रयत्न केले होते. ही गोष्ट योग्य वाटते. सर्वच अध्यापक विद्यालयामध्ये सराव पाठातील कमतरता दूर करण्यासाठी विविध प्रयत्न करावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न ६३वा, सराव पाठासाठी पुरेशा शाळा उपलब्ध होतात का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.२३ मध्ये देण्यात आली आहे.

// आलेख क्र. - १२ //

को.क्र. ५.२३ सराव पाठासाठी शाळेच्या उपलब्धतेनुसार वर्गीकरण.

प्रमाण ३६ = १0% विद्यालय



**कोष्टक क्रमांक ५.२३**

**सराव पाठासाठी शाळांचे उपलब्धतेनुसार वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पुरेशा शाळा उपलब्ध होतात. | १२ | ७०.५८ |
| २ | पुरेशा शाळा उपलब्ध होत नाहीत. | ०३ | १७.६४ |
| ३ | शिक्षणाधिकारी (मा) यांच्या शिफारशीनुसार काही शाळा उपलब्ध होतात. | ०२ | ११.७८ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२३ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी १२ (७०.५८%) अध्यापक विद्यालयांना सराव पाठासाठी पुरेशा शाळा उपलब्ध होत्या. ३ (१७.६४%) अध्यापक विद्यालयांना सराव पाठसाठी पुरेशा शाळा उपलब्ध नव्हत्या तर २ (११.७८%) अध्यापक विद्यालयांना शिक्षणाधिकारी (मा) यांच्या शिफारशी पत्रानुसार सराव पाठासाठी कांही शाळा उपलब्ध होत्या.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये सराव पाठासाठी पुरेशा शाळा उपलब्ध केल्या जातात का? अस प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२४ (७०.५८%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की पुरेशा शाळा उपलब्ध होत्या. ६ (१७.६४%) शिक्षकांनी सांगितले की, पुरेशा शाळा उपलब्ध होत नव्हत्या. ४ (११.७८%) शिक्षकांनी सांगितले की, शिक्षणाधिकारी (मा) यांच्या शिफारशीनुसार कांही शाळा उपलब्ध होत्या.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात ११ अध्यापक विद्यालयांना सराव पाठासाठी शाळा उपलब्ध होत्या. तर ६ अध्यापक विद्यालयांना सराव पाठासाठी शाळा उपलब्ध नव्हत्या. त्यातही शिक्षणाधिका-यांच्य सांगण्यावरून २ अध्यापक विद्यालयांना सरावपाठासाठी शाळा मिळत होत्या असे दिसून आले.

यावरून ११ (६४.७०%) विद्यालयांना पुरेशा शाळा सरावपाठासाठी मिळत होत्या. तर ६ (३५.३०%) विद्यालयांना पुरेशा शाळा सरावासाठी मिळत नव्हत्या. त्यातही २ (११.७८%)

विद्यालयांना सरावासाठी शाळा शिक्षणाधिका-यांच्या सांगण्यावरून मिळत होत्या. संशोधकाला चर्चेतून आढळून आले की, अनेक शाळा सराव पाठासाठी तयार नसतात. त्यांचे चांगले सहकार्य मिळत नाही. जिल्हा परिषदेच्या किंवा नगरपालिकेच्या शाळा मिळतात. खाजगी शाळा देण्यास संस्थाचालक तयार होत नाही असे सर्वसाधारण आढळून आले. अध्यापन हे सरावातून अधिक परिपक्व होत असते. जितका सराव जास्त तितके अध्यापन परिणामकारक होते. त्यासाठी सर्व अध्यापक विद्यालयांना सराव पाठासाठी पुरेशा शाळा उपलब्ध असाव्यात असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.६४वा, त्यासाठी आणखी कोणत्या अडचणी येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांना प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी १२(७०.५८%) विद्यालयांना सराव पाठासाठी शाळा उपलब्ध होत्या. परंतु त्यांना शैक्षणिक वर्ष ऑगस्ट ते जूलै असल्याने ऑक्टोबर मध्ये सहामाही परिक्षेमुळे शाळा उपलब्ध होत नव्हत्या. तसेच मार्च ते जूलै या कालावधीत वार्षिक परिक्षा व उन्हाळा सुट्टी असल्याने पाठासाठी शाळा उपलब्ध होत नव्हत्या. म्हणून उरलेल्या काळात अध्यापनाऐवजी पाठ पूर्ण करावे लागत होते असे सांगितले. तर ५(२९.४२%) अध्यापक विद्यालयांना सराव पाठासाठी पुरेशा शाळा उपलब्ध होत नव्हत्या. तसेच त्यांना नगरपालिकेच्या शाळेच्या वेळापत्रकाप्रमाणे सराव पाठाचे वेळापत्रक तयार करावे लागत होते. त्यातही शिक्षणाधिका-यांच्या सांगण्यावरून २(११.७८%) विद्यालयांना सरावासाठी शाळा मिळत होत्या.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयांना शैक्षणिक वर्ष ऑगस्ट ते जूलै असल्याने ऑक्टोबर मध्ये सहामाही परिक्षेमुळे सराव पाठासाठी शाळा उपलब्ध होत नव्हत्या. ही बाब योग्य वाटत नाही. अध्यापक विद्यालयांचे शैक्षणिक वर्ष जून ते मे असावे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न ६५ वा, पाठ निरीक्षणाचे काम समाधानकारक होते काय? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ७ (४१.१८%) विद्यालयातील प्राचार्यांनी सांगितले की, पाठ निरीक्षणाचे काम समाधानकारक होते. १० (५८.८२%) विद्यालयातील प्राचार्यांनी सांगितले की, पाठ निरीक्षणाचे काम समाधानकारक नव्हते.

यावरून ७ (४१.१८%) विद्यालयामध्ये पाठनिरीक्षण समाधानकारक होते पण १0 (५८.८२%) विद्यालयामध्ये पाठनिरीक्षण समाधानकारक नव्हते. ही बाब समाधानकारक वाटत नाही. सर्व अध्यापक विद्यालयामध्ये पाठनिरीक्षण योग्य व्हावे असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्र.६६वा, पाठ निरीक्षण व्यवस्थित होण्यासाठी आपण कोणते प्रयत्न करता? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र.५.२४ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.२४**

**पाठनिरीक्षण व्यवस्थित होण्यासाठी प्रयत्नांनुसार वर्गीकरण**


| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येक शिक्षक एकावेळी एका पाठाचे निरीक्षण करतात. | 0७ | ४१.१८ |
| २ | ज्येष्ठ शिक्षक एकावेळी एका पाठाचे निरीक्षण करतात. | 0२ | ११.७६ |
| ३ | विषय शिक्षक एकावेळी दोन पाठांचे निरीक्षण करतात. | 0३ | १७.६५ |
| ४ | निरीक्षण श्रेणीचा वापर करतात. | 0३ | १७.६५ |
| ५ | अध्यापनाविषयी चर्चेद्वारे पाठ निरीक्षण करतात. | 0२ | ११.७६ |
| | एकूण | १७ | १00.00 |

वरील कोष्टक क्रमांक ५.२४ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांपैकी ७(४१.१८%) विद्यालयातील एक शिक्षक एकावेळी एका पाठाचे निरीक्षण करत होते. २ (११.७६%) विद्यालयामध्ये ज्येष्ठ शिक्षक एकावेळी एका पाठाचे निरीक्षण करत होते. ३ (१७.६५%) विद्यालयामध्ये विषय शिक्षक एकावेळी दोन पाठाचे निरीक्षण करत होते. ८(१७.६५%) विद्यालयामध्ये सराव पाठातील पाठाचे निरीक्षण श्रेणीचा वापर करून करत होते. २

// आलेख क्र. - १३ //

को.क्र. ५.२५ अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यासाठी केलेल्या उपायांचे वर्गीकरण.

प्रमाण १ से.मी = १०%



(११.७६%) विद्यालयामध्ये सर्व शिक्षक एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या अध्यापनाविषयी चर्चा करून त्याचा उपयोग पाठ निरीक्षण करत होते.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ७ विद्यालयामध्ये सराव पाठाचे निरीक्षण एक शिक्षक एका वेळी एका पाठाचे निरीक्षण करत होते तर १0 विद्यालयामध्ये सराव पाठ संपविण्यासाठी पाठाचा सप्ताह द्वारे कसेतरी पाठ संपविले जात असल्याने संशोधकाला प्रत्यक्ष भेटीत आढळून आले. यावरून प्रत्येक शिक्षक एकावेळी एका प्रशिक्षकाचे पाठ निरीक्षण करीत नव्हते. कांही अध्यापक विद्यालयामध्ये पाठाचा सप्ताह द्वारे पाठ संपविले जात असल्याने संशोधकाला प्रत्यक्ष भेटीत आढळून आले. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने चांगली नव्हती. सर्व अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकांनी एका प्रशिक्षकाचे पाठ निरीक्षण करावे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ६७ वा, अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी कोणते प्रयत्न करता? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती खालील कोष्टकात देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.२५**

**अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी केलेल्या उपायांचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | जादा तास घेण्यात येतात. | २ | ११.७७ |
| २ | वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते. | ७ | ४१.१७ |
| ३ | स्वयंअध्ययन कार्यक्रम राबवितात. | ६ | ३५.२९ |
| ४ | कोणतेच उपाय करत नाहीत. | २ | ११.७७ |
| | एकूण | १७ | **१00.00** |

वरील कोष्टक क्रमांक ५.२५ वरून असे दिसून येते की, २(११.७७%) अध्यापक विद्यालयामध्ये अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी जादा तास घेण्यात येत होते. ७(४१.१७%) अध्यापक विद्यालयामध्ये अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक मार्गदर्शन केले जात होते. ६ (३५.३0%) अध्यापक विद्यालयामध्ये अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन

पद्धतीने अभ्यास करून घेतले होते तर २(११.७७%) अध्यापक विद्यालयांमध्ये कोणत्याही प्रकारचे उपाय केले नव्हते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी कोणते प्रयत्न करता? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

१४(४१.१८%) शिक्षकांनी सांगितले की, जादा तास वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते. २०(५८.८२%) शिक्षकांनी सांगितले की कोणतेच उपाय केले नव्हते.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ विद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर चर्चा केली. त्यात ६ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सांगितले की अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी जादा तास व वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते तर ११ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सांगितले की अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी कोणतेच उपाय केले जात नव्हते.

यावरून बहुसंख्य अध्यापक विद्यालयात प्राचार्यांच्या माहितीतून जादा तास, वैयक्तिक मार्गदर्शन, स्वयंअध्ययन असे प्रयत्न केले असे सांगितले गेले तरी शिक्षकांच्या मुलाखतीतून, विद्यार्थ्यांच्या चर्चेतून असे आढळले की, कांही थोडया अध्यापक विद्यालयात हे कार्यक्रम अमलात आणले जातात. विना अनुदानित व ग्रामीण अध्यापक विद्यालयात अभ्यासक्रम पूर्ण करणे, विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देणे, जादा तास घेणे या गोष्टी अभावानेच आढळल्या. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती.

सर्व अध्यापक विद्यालयामध्ये अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी विविध प्रयत्न करावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ६८वा, शालेय कामे सोडून अवांतर कोणकोणती कामे शिक्षकांना करावी लागतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.२६ मध्ये देण्यात आली आहे.

### कोष्टक क्रमांक ५.२६

### शिक्षकांना कराव्या लागणा-या अवांतर कामानुसार वर्गीकरण.

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | गटसंमेलनात मार्गदर्शक म्हणून काम करणे. | ०४ | २३.५२ |
| २ | स्मार्ट पीटीसाठी मार्गदर्शक. | ०७ | ४१.१७ |
| ३ | विविध क्रीडा स्पर्धेत पंच म्हणून काम करणे. | ०६ | ३५.३० |
| ४ | प्रौढ शिक्षण प्रसार कृतीसत्रातून मार्गदर्शक म्हणून काम करणे. | ०४ | २३.५२ |
| ५ | साक्षरता अभियानात प्रत्यक्ष सहभागी होणे. | १० | ५८.८२ |
| ६ | वस्ती शाळा ट्रेनिंगचे काम करणे. | ०५ | २९.४१ |
| ७ | अवांतर कामे करण्यात येत नव्हती. | ०७ | ४१.१७ |


टीप :- प्रत्येक प्राचार्यांनी विद्यालयामध्ये एकापेक्षा अधिक अवांतर कामे शिक्षक करीत होते असे प्रश्नावलीत नमूद केले आहे. त्यामुळे एकूण संख्या १७ पेक्षा अधिक आली आहे.

वरील कोष्टक क्रमांक ५.२६ वरून असे दिसून येते की, ४(२३.५२%) विद्यालयातील प्राचार्यांनी सांगितले की, शिक्षक गट संमेलनात मार्गदर्शकाचे काम करीत होते. ७(४१.१७%) विद्यालयातील प्राचार्यांनी सांगितले की, शिक्षक स्मार्ट पी.टी.साठी मार्गदर्शकाचे काम करीत होते. ६ (३५.३०%) विद्यालयातील प्राचार्यांनी सांगितले की, शारीरिक शिक्षक विविध क्रीडा स्पर्धेत पंच म्हणून काम करत होते. ४(२३.५२%) विद्यालयातील प्राचार्यांनी सांगितले की, शिक्षक प्रौढ शिक्षण प्रसार कृतीसत्रात मार्गदर्शक म्हणून काम करीत होते. १०(५८.८२%) विद्यालयातील प्राचार्यांनी सांगितले की, शिक्षक साक्षरता अभियानात प्रत्यक्ष सहभागी होते. ५(२९.४१%) विद्यालयातील प्राचार्यांनी सांगितले की, शिक्षक वस्ती शाळेतील शिक्षकांना ट्रेनिंग देण्याचे काम करत होते. तर ७(४१.१७%) विद्यालयातील प्राचार्यांनी सांगितले की, शिक्षक कोणत्याच प्रकारची अवांतर कामे करीत नव्हते.

यावरून बहुतांश (५८.८२%) अध्यापक विद्यालयतील शिक्षक अध्यापनापेक्षा अवांतर कामे करत होते. अवांतर कामामुळे शिक्षक पंधरा दिवस ते तीस दिवस अध्यापनापासून दूर राहतात. त्याचा

// आलेख क्र. - १४ //

को.क्र. ५.२७ वैयक्तिक उपक्रमानुसार वर्गीकरण.



परिणाम अध्यापनावर, विद्यार्थ्यावर होतो असे संशोधकाला वाटते. अध्यापनावर चांगला परिणाम होण्यासाठी शासनाने शिक्षण विभागावर कोणतेही अवांतर काम सोपवू नये असे संशोधकाला वाटते.

सहशालेय व शालेय कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होतो. सर्वांगिण विकास साध्य करण्याच्या हेतूने प्रश्न क्रमांक ६९वा, विद्यार्थ्यासाठी कोणते वैयक्तिक उपक्रम घेतले जातात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती खालील कोष्टकात देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.२७**

**वैयक्तिक उपक्रमानुसार वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | हस्ताक्षर स्पर्धा. | ०८ | ४७.०५ |
| २ | चित्रकला स्पर्धा. | १३ | ७६.४७ |
| ३ | वक्तृत्व स्पर्धा. | १७ | १००.०० |
| ४ | विज्ञान उपक्रम निर्मिती स्पर्धा. | १५ | ८८.२३ |
| ५ | इतर उपक्रम. | ०७ | ४१.७६ |

टीप :- प्रत्येक प्राचार्यानी विद्यालयामध्ये एका पेक्षा अधिक वैयक्तिक उपक्रम राबवितो असे प्रश्नावलीत नमूद केलेले आहे. त्यामुळे एकूण संख्या १७ पेक्षा अधिक आली आहे.

वरील कोष्टक क्रमांक ५.२७ वरून असे दिसून येते की, ८(४७.०५%) अध्यापक विद्यालयामध्ये हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात येत होत्या. १३(७६.४७%) विद्यालयामध्ये चित्रकला स्पर्धा घेण्यात येत होत्या. १७(१००%) म्हणजेच सर्व अध्यापक विद्यालयामध्ये वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येत होत्या. १५(८८.२३%) अध्यापक विद्यालयामध्ये विज्ञान उपक्रम निर्मिती स्पर्धा घेण्यात होत्या. ७ (४१.७६%) अध्यापक विद्यालयामध्ये इतर उपक्रम म्हणजे क्रीडा स्पर्धा, निबंध स्पर्धा, गायन स्पर्धा इत्यादी घेण्यात येत होत्या.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये विद्यार्थ्यांसाठी कोणते वैयक्तिक उपक्रम घेतले जातात? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२१(६१.७६%) प्रतिसादक शिक्षकांनी सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, व्याख्यान स्पर्धा इत्यादी वैयक्तिक उपक्रम घेतले होते असे सांगितले. ९(२६.४७%) प्रतिसादक शिक्षकांनी निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, गायन स्पर्धा, स्नेह संमेलन, वनभोजनाचे इत्यादी कार्यक्रम घेतले होते असे सांगितले. ४(११.७६%) प्रतिसादक शिक्षकांनी वैयक्तिक उपक्रम घेण्यास प्रशासकीय सहकार्य नव्हते. कार्यक्रमाच्या सूचना आयत्यावेळी दिल्या जात होत्या. सहकारी शिक्षक सहकार्य करत नव्हते असे सांगितले.

यावरून बहुसंख्य (९४.११%) अध्यापक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक उपक्रम घेतले जात होते हे मुलाखतीतून आढळून आले. ही बाब चांगली होती व वैयक्तिक उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास घडवून आणण्यास मोलाची मदत होत असेल असे संशोधकाला वाटते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा भावनात्मक क्षेत्राचा विकास चांगल्या प्रकारे घडवून आणणे शक्य असते असे संशोधकास वाटते. अध्यापक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक उपक्रमांचे आयोजन केले जावे. या उपक्रमासाठी संस्था चालकांनी केवळ अर्थसहाय्य करून चालणार नाही तर त्यासाठी साधनांची व पूरक बाबींची पूर्तता करावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ७0वा, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून किती वेळा करण्यात येते? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती खालील कोष्टकात देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.२८**

**विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणीचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एक वेळा. | 0४ | २८.५३ |
| २. | दोन वेळा. | 0१ | ५.८८ |
| ३. | नाही. | १२ | ७0.५९ |
| | एकूण | १७ | १00.00 |

वरील कोष्टक क्रमांक ५.२८ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ४(२३.५३%) अध्यापक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून एक वेळा केली होती. एका (५.८८%) विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून दोन वेळा केली होती. १२(७०.५९%) विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून एकदाही केली नव्हती.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात ३ विद्यालयमध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली होती. १४ विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली नव्हती. हे प्रत्यक्ष भेटीतून व विद्यार्थ्यांच्या चर्चेतून दिसून आले.

यावरून (२९.४१%) अध्यापक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणीची दक्षता घेतली जात होती असे सांगितले असले तरी संशोधकाला आरोग्य तपासणीबद्दल बहुसंख्य विद्यालये काळजी घेत नव्हते हे भेटी व चर्चेच्या वेळी दिसून आले. ही बाब विद्यार्थ्यांच्या दृष्टीने चांगली नव्हती.

अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून किमान दोन वेळा केली जावी असे संशोधकाला वाटते.

उ. कार्यालयीन कामकाज व दप्तर :-

प्रश्नावलीत सातव्या भागात कार्यालयीन कामकाज व विद्यालये दप्तर याविषयी माहिती विचारण्यात आलेली होती. या विभागामध्ये प्रश्न क्रमांक ७१ पासून ७९ पर्यत एकूण ९ प्रश्न विचारण्यात आलेले होते.

अध्यापक विद्यालयामध्ये प्राथमिक शिक्षक तयार होतात. त्यामुळे त्या विद्यालयातील प्रशिक्षक विद्यार्थ्यांना महत्वाचे स्थान आहे. अध्यापक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची १००% हजेरी भरते का हे पाहण्यासाठी प्रश्न क्र.७१वा, शिक्षक विद्यार्थ्यांची हजेरी घेतात का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.२९ मध्ये देण्यात आली आहे.

### कोष्टक क्रमांक ५.२९

### विद्यार्थ्यांच्या हजेरीचे वर्गीकरण.

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ०२ | ११.७६ |
| २. | नाही. | १४ | ८२.३६ |
| ३. | पहिल्या व पाचव्या तासाला हजेरी घेतली जाते | ०१ | ०५.८८ |
| | एकूण | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२९ वरून असे दिसून येते की, २(११.७६%) विद्यालयामध्ये शिक्षक विद्यार्थ्यांची हजेरी दर तासाला घेत होते. १४(८२.३६%) विद्यालयामध्ये शिक्षक विद्यार्थ्यांची हजेरी दरतासाला घेत नव्हते. तर एका (५.८८%) विद्यालयात शिक्षक विद्यार्थ्यांची हजेरी पहिल्या व पाचव्या तासाला घेत होते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये विद्यार्थ्यांची हजेरी दरतासाला घेतली जाते का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२८(८२.३६%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की विद्यार्थ्यांची दर तासाला हजेरी घेण्यात येत नव्हती. तर २(५.८८%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, विद्यार्थ्यांची हजेरी दर तासाला घेण्यात येत होती. ४(११.७६%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, विद्यार्थ्यांची हजेरी पहिल्या तासाला सुद्धा घेण्यात येत नव्हती.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांशी चर्चा केली असता दर तासाला हजेरी घेण्यात येत नव्हती असे आढळून आले.

यावरून बहुसंख्य (८२.३६%) विद्यालयामध्ये दरतासाला हजेरी घेतली नव्हती. शिक्षकांच्या मुलाखतीवरून व विद्यार्थ्यांच्या चर्चेवरून सोलापूर जिल्ह्यातील कांही विद्यालयामध्ये दरतासालाच काय पण दररोजची हजेरीही नियमित घेत नव्हते असे आढळून आले. त्या अध्यापक विद्यालयातून प्रशिक्षण समाधानकारक मिळत नसल्याचे दिसून येते.

विद्यालयामध्ये दररोज दरतासाला हजेरी घेतल्यामुळे गैरहजर विद्यार्थी शोधून त्यांच्या पालकांशी संपर्क साधता येईल. दरतासाला हजेरी घेतल्यामुळे वर्गाची (अध्यापक विद्यालयाची) उपस्थिती वाढेल असे संशोधकाला वाटते.

शिक्षणातील महत्वाचा घटक शिक्षक आहे. शिक्षक जर नियमित वेळेवर येत असेल तर अध्यापनावर चांगला परिणाम होतो. त्यासाठी शिक्षक वेळेवर येतात का हे पाहण्यासाठी प्रश्न क्रमांक ७२वा, लेट येणा-या शिक्षकांसाठी 'लेट मस्टर' ठेवता का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ७(४१.१७%) अध्यापक विद्यालयामध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी 'लेट मस्टर' ठेवले होते तर १० (५८.८३%) अध्यापक विद्यालयांमध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी 'लेट मस्टर' ठेवले नव्हते.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ५ विद्यालयांमध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी लेट मस्टर ठेवले होते. १२ विद्यालयांमध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी लेट मस्टर ठेवले नव्हते हे दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यात १२(७०.८४%) अध्यापक विद्यालयांमध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी 'लेट मस्टर' ठेवले नव्हते तर ५(२९.४२%) अध्यापक विद्यालयामध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी 'लेट मस्टर' ठेवले होते. ही बाब समाधानकारक वाटत नाही हे प्रत्यक्ष भेटीच्या वेळी आढळून आले.

प्राचार्याशी चर्चा केली असता, उशिरा येणा-या शिक्षकांवर कार्यवाही केल्यास संस्थाचालकांकडून रद्द करून आणतात. त्यामुळे प्राचार्य कांहीही करू शकत नाहीत. ही बाब गंभीर आहे. प्रत्येक अध्यापक विद्यालयामध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी 'लेट मस्टर' ठेवावे व उशिरा येणा-या शिक्षकांवर योग्य कार्यवाही करावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ७३वा, विद्यालयात मागविली जात असलेली पुस्तके, मासिके व परिपत्रक यांची स्वतंत्र नोंद ठेवता का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १५(८८.२३%) विद्यालयांमध्ये पुस्तके, मासिके व परिपत्रकांच्या स्वतंत्र नोंदी

ठेवल्या जात होत्या तर २ (११.७७%) विद्यालयांमध्ये पुस्तके, मासिके व परिपत्रकांच्या स्वतंत्र नोंदी ठेवल्या नव्हत्या.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात १५ विद्यालयांमध्ये पुस्तके, मासिके व परिपत्रकांच्या स्वतंत्र नोंदी ठेवल्या होत्या तर २ विद्यालयांमध्ये पुस्तके, मासिके व परिपत्रकांच्या स्वतंत्र नोंदी ठेवल्या नव्हत्या हे दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य १५(८८.२३%) अध्यापक विद्यालयांमध्ये पुस्तके, मासिके व परिपत्रके यांच्या स्वतंत्र नोंदी ठेवल्या होत्या. ही बाब समाधानकारक वाटते.

प्रत्येक अध्यापक विद्यालयामध्ये पुस्तके, मासिके व परिपत्रकांच्या नोंदी ठेवाव्यात असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ७४वा, तपासणी अधिका-यांसाठी 'नोंद वही' (शेरे बुक) ठेवता का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, तपासणी अधिका-यांसाठी नोंद वही ठेवणा-या विद्यालयांचे प्रमाण १४(८२.३५%) होते तर तपासणी अधिका-यांसाठी नोंद वही न ठेवणा-या विद्यालयांचे प्रमाण ३(१७.६५%) होते.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ११ अध्यापक विद्यालयांमध्ये तपासणी अधिका-यांसाठी नोंदवह्या ठेवल्या होत्या. परंतु तपासणी अधिका-यांच्या भेटी वर्षातून एकदाच दिसून आल्या. अचानक भेटी खूप कमी होत्या. उपसंचालक वर्षातून एकदा कांही विशिष्ट अध्यापक विद्यालयांना धावती भेट देत होते. ६ अध्यापक विद्यालयांमध्ये तपासणी अधिका-यांसाठी नोंदवह्या ठेवल्या नव्हत्या हे दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील ११(६४.७0%) विद्यालयांमध्ये तपासणी अधिका-यांसाठी नोंदवह्या ठेवल्या होत्या तर ६(३५.३0%) विद्यालयांमध्ये तपासणी अधिका-यांसाठी नोंदवह्या ठेवल्या नव्हत्या. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती. तपासणी अधिका-याने वर्षातून प्रत्येक विद्यालयाला दोन ते तीन भेटी द्याव्यात व शिक्षक आणि प्राचार्य यांना मार्गदर्शन करावे असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्र.७५वा, तपासणी अधिका-यांकडून दप्तर तपासून वस्तुनिष्ठ सूचना दिल्या जातात का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील सर्वच अध्यापक विद्यालयांमध्ये तपासणी अधिका-यांच्या भेटीच्या वेळी अधिकारी सूचना देतात, दप्तर तपासतात असे सर्व प्राचार्यांनी सांगितले.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या असता ११ अध्यापक विद्यालयांमध्ये तपासणी अधिका-यांच्या भेटीच्या वेळी अधिकारी सूचना देतात, दप्तर तपासतात याच्या नोंदी पहावयास मिळाल्या तर ६ अध्यापक विद्यालयांमध्ये तपासणी अधिका-यांच्या भेटीच्यावेळी अधिकारी सूचना देतात, दप्तर तपासतात यांच्या नोंदी पहावयास मिळाल्या नाहीत, हे दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील ११(६४.७०%) अध्यापक विद्यालयातील दप्तराची तपासणी करून तपासणी अधिकारी सूचना देतात असे दिसून आले. प्रत्येक विद्यालयातून वर्षातून दोनदा तपासणी अधिका-यांकडून दप्तर तपासले जावे असे संशोधकाला वाटते.

शैक्षणिक क्षेत्राचा विकास पालक व शिक्षक यांच्या परस्पर सहाकार्यातून होत असतो. त्यासाठी शिक्षक पालक संघाची आवश्यकता असते. या संघामार्फत एकामेकांच्या विचारांची देवाणघेवाण होत असते. यांच्यातूनच नवनवीन विचारांचा उदय होतो. या विचारातून विद्यालयाचा विकास होतो. त्यासाठी शिक्षक पालक संघाची गरज आहे. शिक्षक पालक संघाचे काम कसे चालते हे पाहण्यासाठी प्रश्न क्र.७६वा, शिक्षक पालक संघाच्या सभेच्या अहवालाची नोंद ठेवता का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ६(३५.३०%) विद्यालयांमध्ये शिक्षक पालक संघाच्या सभेच्या अहवालाची नोंद ठेवली जात होती. तर ११(६४.७०%) विद्यालयांमध्ये शिक्षक पालक संघाच्या सभेच्या अहवालाची नोंद ठेवली जात नव्हती.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात ६ विद्यालयांमध्ये शिक्षक पालक संघाच्या सभेच्या अहवालाच्या नोंदी पहावयास मिळाल्या पण अजूनही कांही विद्यालयांना प्रोसिडींग लिहीता येत नव्हते. त्यासाठी प्रशासनाने भेटीच्या वेळी तशा सूचना द्याव्यात व नमूना दाखवावा. ११ विद्यालयांमध्ये शिक्षक पालक संघाची स्थापना केलेली नव्हती. त्यामुळे त्यांनी सभेच्या अहवालाच्या नोंदी

ठेवल्या नव्हत्या. ही अध्यापक विद्यालये विनाअनुदानित तत्वावर चालविली जातात. त्यामुळे त्यांच्यावरती फक्त संस्थाचालकांचे नियंत्रण होते असे आढळून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील ११(६४.७0%) विद्यालयामध्ये शिक्षक पालक संघाची योजना राबविली नव्हती. ही प्राथमिक शाळेच्या शिक्षकाच्या चांगल्या प्रशिक्षणाच्या दृष्टीने योग्य गोष्ट नव्हती. सर्व अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षक पालक संघाची स्थापना करून संघाच्या सभेच्या अहवालाच्या नोंदी ठेवाव्यात असे संशोधकाला वाटते.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर सेवापुस्तकांची गरज भासते. या सेवापुस्तकामध्ये जन्मतारीख, शैक्षणिक पात्रता, वेतन, सेवेचा कालावधी, वेतनवाढ दिल्याची तारीख इत्यादीची माहिती असते. सेवा व वेतन यांच्यानुसार निवृत्तीवेतन दिले जाते. त्यासाठी सेवापुस्तकांची आवश्यकता असते. सेवापुस्तके अद्ययावत आहेत का हे पाहण्यासाठी प्रश्न क्र.७७वा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत आहेत का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, ९(५२.९४%) विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत होती. तर ८(४७.0६%) विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत नव्हती.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात ७ विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत होती तर १0 विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्म चारी यांची सेवापुस्तके अद्ययावत नव्हती. ही विद्यालये विनाअनुदानित असल्याने कर्मचारी स्थिर नव्हते हे दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील ७(४१.१८%) अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत होती तर १0(८८.८२%) अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत नव्हती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य वाटत नाही.

सेवापुस्तके म्हणजे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या अयुष्यभराच्या कामाचा आरसा असतो. त्यामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या चांगल्या कामाची तसेच इतर गोष्टींचीही नोंद

घेतलेली असते. सेवापुस्तके अद्ययावत नसल्यास पेन्शन मंजुरीच्या वेळी अडचणी येतात व प्रमोशन देतानाही त्यांच्या सेवा अढावा सेवापुस्तकावरून घेता येतो. त्यासाठी प्रशासनाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची प्रत्येक अध्यापक विद्यालयामध्ये सेवापुस्तके अद्ययावत असावीत असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ७८वा, सेवापुस्तके अद्ययावत नसल्यास का नाहीत? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, ९(५२.९४%) विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवली जात होती तर ८(४७.०६%) विद्यालयामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवली जात नव्हती. ही विद्यालये विनाअनुदानित तत्वावर चालविली जात होती. विनाअनुदानित विद्यालय असल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पगार नियमाप्रमाणे दिले जात नव्हते. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग टिकून रहात नव्हते. या कारणामुळे सेवापुस्तके अद्ययावत नव्हती असे प्रतिसादक प्राचार्यांनी सांगितले.

संशोधकाने १७ विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यात ७ विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत होती तर १0 विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत नव्हती ही विद्यालये विनाअनुदानित तत्वावर चालविले जात होती. विनाअनुदानित विद्यालय असल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पगार नियमाप्रमाणे दिले जात नव्हते. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग टिकून रहात नव्हता. या कारणामुळे सेवापुस्तके अद्ययावत नव्हती हे दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील १0(५८.८२%) विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शासनाच्या नियमाप्रमाणे पगार दिले जात नव्हते. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग टिकून रहात नव्हते. त्यामुळे सेवापुस्तके अद्ययावत नव्हती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने समाधानकारक वाटत नव्हती.

प्रत्येक अध्यापक विद्यालयांमध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे पगार देऊन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवावीत असे संशोधकाला वाटते.

अध्यापक विद्यालयाच्या प्रशासकीय कामकाज फाईल/रजिस्टर यांच्या माध्यमातून चालते. त्यामुळे फाईल/रजिस्टर यांना अनन्यसाधारण महत्व असते. सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांमध्ये फाईल/रजिस्टर अद्ययावत आहेत का हे पाहण्यासाठी प्रश्न क्र.७९वा, विद्यालयात खालील फाईल/रजिस्टर उपलब्ध आहेत का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र.५.३० मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.३०**

**फाईल व रजिस्टरच्या उपलब्धतेनुसार वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश अर्ज फाईल. | १७ | |
| २. | शेरे बुक. | ११ | |
| ३. | लॉग बुक. | १४ | |
| ४. | हालचाल नोंद वही. | १४ | |
| ५. | आरोग्य तपासणी वही. | ११ | |
| ६. | दाखल फाईल. | १७ | |
| ७. | १९८६ धोरण पुस्तिका. | १४ | |
| ८. | १९९५ क्षमताधिष्ठित अभ्यासपुस्तिका. | १४ | |
| ९. | जीवन शिक्षण अंक संग्रह फाईल. | १३ | |
| १०. | कर्मचारी हजेरी पुस्तिका. | १७ | |
| ११. | मासिक अहवाल. | १७ | |
| १२. | रोजकिर्द. | १५ | |
| १३. | जमा पावती. | १७ | |
| १४. | खतावणी. | १७ | |
| १५. | पेटी कॅशबुक. | १३ | |
| १६. | आवक/जावक फाईल. | १५ | |
| १७. | पेड बिल फाईल. | १७ | |
| १८. | अनपेड बिल फाईल. | १६ | |
| १९. | शिक्षण संचालनालय फाईल. | १७ | |
| २०. | वेतनदेयक फाईल. | १७ | |
| २१. | E.P.F/ P.F. फाईल. | १४ | |
| २२. | कर्मचारी वैयक्तिक फाईल. | १४ | |
| २३. | जनरल रजिस्टर. | १७ | |

टीप :- प्रत्येक प्राचार्यांनी विद्यालयामध्ये एकापेक्षा अधिक फाईल व रजिस्टर ठेवले होते असे प्रश्नावलीत नमूद केलेले आहे त्यामुळे एकूण संख्या १७ पेक्षा अधिक आली आहे.

वरील कोष्टक क्रमांक ५.३० चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी १७(१००%) विद्यालयामध्ये प्रवेश अर्ज फाईल, कर्मचारी हजेरी पुस्तिका, मासिक अहवाल, जमा पावती, खतावणी, पेड बिल फाईल, शिक्षण संचलनालय फाईल, वेतन देयक बिल फाईल, जनरल रजिस्टर्स इत्यादी फाईल व रजिस्टर होते. १४(८२.३५%) विद्यालयामध्ये लॉगबुक, हालचाल नोंदवही, १९८६ धोरण पुस्तिका, १९९५ क्षमताधिष्ठित अभ्यासपुस्तिका, EPF/PF फाईल, कर्मचारी वैयक्तिक फाईल इ. होते. १६(९४.११%) विद्यालयामध्ये दाखल फाईल, अनपेड बिल फाईल इ. होते. १५(८८.२३%) विद्यालयामध्ये रोजकिर्द, आवक जावक फाईल इ. होते. १३(७६.४७%) विद्यालयामध्ये जीवन शिक्षण अंक संग्रह फाईल, पेटी कॅशबुक इत्यादी फाईल व रजिस्टर होते. ११(६४.७०%) विद्यालयामध्ये आरोग्य तपासणी वही व शेरेबुक होते.

संशोधकाने १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात सर्व अध्यापक विद्यालयांमध्ये प्राचार्यांनी प्रश्नावलीत फाईल व रजिस्टर या संबंधीत दिलेल्या माहितीनुसार उपलब्ध होते हे भेटीच्या वेळी दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य अध्यापक विद्यालयांमध्ये विविध फाईल व रजिस्टर उपलब्ध होते. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य होती.

प्रत्येक अध्यापक विद्यालयात फाईल व रजिस्टर उपलब्ध असावेत असे संशोधकाला वाटते.

**ऊ. आर्थिक प्रशासनाविषयी माहिती :-**

शैक्षणिक साधने, प्रयोगशाळा, ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदी करणे, क्रीडा साहित्य खरेदी करणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतन देणे, इमारतीचे बांधकाम करणे इत्यादी साठी पैशाची आवश्यकता असते. पैसा जर उपलब्ध असेल तर वरील सर्व साहित्य खरेदी करता येते व पगार वेळच्या वेळी देता येतो.म्हणून सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांमधील आर्थिक प्रशासन

पाहण्यासाठी या विभागामध्ये प्रश्न क्र.८० पासून ते प्रश्न क्र.९० पर्यंत असे एकूण ११ प्रश्न विचारले होते.

प्रश्न क्रमांक ८०वा, विनाअनुदानित विद्यालयांमध्ये उपलब्ध होणारी शिक्षण फी पुरेशी आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ७(४१.१८%) अध्यापक विद्यालयामध्ये उपलब्ध होणारी शिक्षण फी पुरेशी होती. कारण ही अध्यापक विद्यालये अनुदानित होती. त्यांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे इतर बाबींसंबंधीत योग्य खर्च करीत होते. तर १०(५८.८२%) विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये उपलब्ध होणारी शिक्षण फी पुरेशी नव्हती. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा पगार, इतर भौतिक सुविधा, खरेदीसाठी लागणारा खर्च हे सर्व फी मधूनच करावे लागत होते. त्यामुळे शिक्षण फी पुरत नव्हती असे प्रतिसादक प्राचार्यांनी सांगितले.

यावरून विनाअनुदानित विद्यालयांचा खर्च विद्यार्थ्यांच्या फी मधून भागत नव्हता. त्यामुळे विनाअनुदानित विद्यालयातील शिक्षकांना पूर्ण पगार दिला जात नव्हता. इतर भौतिक सुविधा समाधानकारक नव्हत्या. शासनाने विनाअनुदानित विद्यालयांचा खर्च व्यवस्थित भागविण्यासाठी शिक्षण फी मध्ये वाढ करावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ८१वा, नसल्यास कोणत्या अडचणी येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ७ (४१.१८%) विद्यालये ही अनुदानित होती म्हणून त्यांना कोणत्याच प्रकारच्या समस्या येत नव्हत्या. तर १०(५८.८२%) विद्यालये ही विनाअनुदानित असल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याचे वेतन पाचव्या वेतन आयोगानुसार देणे अशक्य होते, भौतिक सुविधा व साहित्य खरेदी करण्यास अडचणी येत होत्या असे प्रतिसादक प्राचार्यांनी सांगितले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील १०(५८.८२%) विद्यालये विनाअनुदानित असल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन पाचव्या वेतन आयोगानुसार देणे अशक्य होते, भौतिक सुविधा व साहित्य खरेदी करण्यास अडचणी होत्या इत्यादी समस्या येत होत्या. ह्या आलेल्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने व संस्थाचालकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.८२वा, विनाअनुदानित विद्यालय असल्यामुळे अध्यापनावर कोणता परिणाम होतो? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून मिळालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांपैकी १० विद्यालये ही विनाअनुदानित होती. विनाअनुदानित विद्यालये असल्यामुळे अध्यापनावर प्रतिकूल परिणाम होतो. पाचव्या वेतन आयोगानुसार शिक्षकांचे पगार देणे अशक्य होते. त्यामुळे शिक्षक स्थिर रहात नव्हते. नेहमी शिक्षक बदलत होते. त्यामुळे डी.एड अभ्यासक्रम समजण्यास शिक्षकांनाच वेळ लागत होता. शिक्षकांना जास्त कष्ट घ्यावे लागतात. त्यामुळे अध्यापनावर प्रतिकूल परिणाम होतो असे प्रतिसादक प्राचार्यांनी सांगितले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील १० (५८.८२%) अध्यापक विद्यालये विनाअनुदानित असल्यामुळे पाचव्या वेतन आयोगानुसार शिक्षकांचे पगार देणे अशक्य होते. त्यामुळे उच्च अर्हता प्राप्त व अनुभवी शिक्षक मिळत नव्हते. त्यामुळे अध्यापनावर प्रतिकूल परिणाम झाला होता.ही बाब अध्यापनाच्या दृष्टीने योग्य नव्हती. विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील अध्यापनावर होणारा प्रतिकूल परिणाम दूर करण्यासाठी शिक्षण फी वाढवून उच्च अर्हता प्राप्त व अनुभवी शिक्षकांची नेमणूक करावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ८३वा, विद्यालयामध्ये वर्षभरातील केलेला किरकोळ दुरूस्तीचा खर्च कशातून करतात? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र.५.३१ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.३१**

**विद्यालयामध्ये वर्षभरातील केलेल्या किरकोळ दुरूस्तीचे खर्चानुसार वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वेतनेतर अनुदान. | ७ | ४१.१८ |
| २. | शिक्षण फी. | ५ | २९.४२ |
| ३. | संस्थेमार्फत खर्च. | २ | ११.७६ |
| ४. | लोकल वर्गणी. | ३ | १७.६४ |
| | एकूण. | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३१ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ७(४१.१८%) विद्यालयामध्ये वर्षभरातील केलेला किरकोळ दुरूस्तीचा खर्च वेतनेतर अनुदानातून केला होता. ही विद्यालये अनुदानित होती म्हणून त्यांना वेतनेतर अनुदान मिळत होते. त्यांच्यातून ते खर्च करत होते. ५(२९.४२%) विद्यालयामध्ये वर्षभरातील केलेला किरकोळ दुरूस्तीचा खर्च शिक्षण फीतून केला होता. २(११.७६%) विद्यालयातील किरकोळ दुरूस्तीचा खर्च संस्थेमार्फत केला होता. तर ३(१७.६४%) विद्यालयामध्ये वर्षभरातील किरकोळ दुरूस्तीचा खर्च स्थानिक वर्गणीतून केला होता.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये विद्यालयामध्ये वर्षभरातील केलेला किरकोळ दुरूस्तीचा खर्च कशातून केला जातो? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

१४(४१.१८%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, विद्यालयामध्ये वर्षभरातील केलेला किरकोळ दुरूस्तीचा खर्च वेतनेतर अनुदानामधून केला होता. १०(२९.४२%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, विद्यालयामध्ये वर्षभरातील केलेला किरकोळ दुरूस्तीचा खर्च शिक्षण फीतून केला होता. तर ६(१७.६४%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, विद्यालयामध्ये वर्षभरातील किरकोळ दुरूस्तीचा खर्च स्थानिक वर्गणीतून केला होता.

संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यात ७ अध्यापक विद्यालयांमध्ये किरकोळ दुरूस्तीचा खर्च वेतनेतर अनुदानामधून केला होता. तर ५ अध्यापक विद्यालयांमध्ये किरकोळ दुरूस्तीचा खर्च शिक्षण फीमधून केला होता. २ विद्यालयामध्ये किरकोळ दुरूस्तीचा खर्च संस्थांमार्फत केला होता. तर ३ अध्यापक विद्यालयामध्ये किरकोळ दुरूस्तीचा खर्च स्थानिक वर्गणीतून केला होता हे दिसून आले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील ७(४१.१८%) विद्यालयांमध्ये वर्षभरातील किरकोळ दुरूस्तीचा खर्च वेतनेतर अनुदानातून केला होता तर १०(५८.८२%) विद्यालयांमध्ये वर्षभरातील किरकोळ दुरूस्तीचा खर्च शिक्षण फी, संस्थामार्फत व स्थानिक वर्गणीतून केला होता.

जी विद्यालये अनुदानित आहेत त्या विद्यालयांना शासनाकडून कर्मचाऱ्यांच्या वेतनावर १२% वेतनेतर अनुदान दिले जाते. हे अनुदान किंवा वेतनेतर अनुदान वर्षभरातील किरकोळ खर्च व भौतिक

सुविधा खरेदी करण्यासाठी याचा उपयोग आवश्यक होतो. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रश्न क्रमांक ८४वा, शासनाकडून मिळणारे १२% वेतनेतर अनुदान पुरेसे आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, ७(४१.१८%) प्राचार्यांनी शासनाकडून मिळणारे १२% वेतनेतर अनुदान पुरेसे होते असे सांगितले. ही विद्यालये अनुदानित होती. तर १0 (५८.८२%) प्राचार्यांनी १२% वेतनेतर अनुदानासंबंधी माहिती दिली नव्हती. ही अध्यापक विद्यालये विनाअनुदानित तत्वावर चालत होती. त्या विद्यालयांना शासनाकडून १२% वेतनेतर अनुदान किंवा इतर कोणतेच अनुदान दिले जात नव्हते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये शासनाकडून मिळणारे १२% वेतनेतर अनुदान पुरेसे आहे का? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

१४(४१.१८%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की शासनाकडून मिळणारे १२% वेतनेतर अनुदान पुरेसे होते. २0%(५८.८२%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, शासनाकडून १२% वेतनेतर अनुदान मिळत नव्हते. ही विद्यालये विनाअनुदानित होती.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील ७(४१.१८%) विद्यालयांना शासनाकडून मिळणारे १२% वेतनेतर अनुदान पुरेसे होते तर १0(५८.८२%) विद्यालयांना शासनाकडून १२% वेतनेतर अनुदान मिळत नव्हते. ही विद्यालये विनाअनुदानित होती.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ८५वा, नसल्यास कोणत्या अडचणी येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, ७(४१.१८%) विद्यालयांना १२% वेतनेतर अनुदान मिळत होते. परंतु विद्यालय अद्ययावत करण्यासाठी १२% वेतनेतर अनुदान अपुरे पडते. खर्च प्रथम करावा लागतो व वेतनेतर अनुदान मार्च अखेरीला मिळेलच याची शाश्वती नसते म्हणून आवश्यक बाबींवरच खर्च करावा लागतो. ग्रंथालयामधील पुस्तके खरेदी, प्रयोगशाळेची साहित्य खरेदी, क्रीडा साहित्य खरेदी करता येत नव्हते इत्यादी अडचणी येत होत्या असे प्रतिसादक प्राचार्यांनी सांगितले. तर १0(५८.८२%) विद्यालयांना वेतनेतर अनुदान मिळत नव्हते. ही विद्यालये विनाअनुदानित होती.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील ७(४१.१८%) अनुदानित अध्यापक विद्यालयांना खर्च प्रथम करावा लागतो व वेतनेतर अनुदान मार्च अखेरीला मिळेलच याची शाश्वती नसते. ग्रंथालयामधील पुस्तके खरेदी, प्रयोगशाळेची साहित्य खरेदी, क्रीडा साहित्य खरेदी करता येत नव्हते इत्यादी अडचणी येत होत्या. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य वाटत नव्हती.

विद्यालयांना अद्ययावत करण्यासाठी १२% ऐवजी २०% वेतनेतर अनुदान शासनाने द्यावे असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्रमांक ८६वा, विनाअनुदानित अध्यापक विद्यालयासाठी उच्च पात्रताधारक शिक्षक उपलब्ध होतात का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १० (५८.८२%) विनाअनुदानित अध्यापक विद्यालये होती. विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांसाठी उच्च पात्रताधारक शिक्षक उपलब्ध होत नव्हते. पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन दिले जात नव्हते. त्यामुळे उच्च पात्रताधारक शिक्षक विद्यालयास मिळू शकत नव्हते असे प्रतिसादक प्राचार्यांनी सांगितले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील १०(५८.८२%) विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये एकही उच्च पात्रताधारक शिक्षक उपलब्ध नव्हते. ही फारच वाईट गोष्ट होती. प्रत्येक विनाअनुदानित अध्यापक विद्यालयामध्ये उच्च पात्रताधारक शिक्षक असावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ८७वा, नसल्यास कोणत्या समस्या येतात? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, १०(५८.८२%) प्राचार्यांनी N.C.T.E. चे norms प्रमाणे पात्र शिक्षक मिळत नव्हते त्यामुळे शासनाने विद्यार्थी संख्या घटविली असे सांगितले.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील १०(५८.८२%) विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांना N.C.T.E. चे norms प्रमाणे पात्र शिक्षक मिळत नव्हते त्यामुळे शासनाने विद्यार्थी संख्या घटविली ह्या समस्या येत होत्या. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती.

प्रश्न क्रमांक ८८वा, अनुदान उपलब्ध नसल्यामुळे शासनाच्या नियमानुसार शिक्षकांना पगार दिले जाते का? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.३२ मध्ये देण्यात आली आहे.

### कोष्टक क्रमांक ५.३२

### शासनाच्या नियमानुसार देण्यात येणा-या पगारानुसार विद्यालयाचे वर्गीकरण

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय . | ०७ | ४१.१८ |
| २. | नाही. | १० | ५८.८२ |
| | एकूण. | १७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३२ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ७(४१.१८%) विद्यालयांमध्ये शासनाच्या नियमानुसार शिक्षकांना वेतन दिले जात होते. तर १०(५८.८२%) विनाअनुदानित विद्यालयांमध्ये अनुदान उपलब्ध नसल्यामुळे शासनाच्या नियमानुसार शिक्षकांना वेतन दिले जात नव्हते.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये अनुदान उपलब्ध नसल्यामुळे शासनाच्या नियमानुसार पगार दिला जातो का? असा प्रश्न विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांनी पुढील उत्तरे दिली.

२०(५८.८२%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, अनुदान उपलब्ध नसल्यामुळे शासनाच्या नियमानुसार वेतन दिले जात नव्हते. ही विद्यालये विनाअनुदानित होती.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील १०(५८.८२%) विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये अनुदान उपलब्ध नसल्यामुळे शासनाच्या नियमानुसार वेतन दिले नव्हते. ही बाब शिक्षकांच्या दृष्टीने योग्य वाटत नाही. प्रत्येक विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांमधील शिक्षकांना शासनाच्या नियमानुसार वेतन द्यावे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक ८९वा, नसल्यास कोणत्या समस्या येतात ? असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी १० (५८.८२%) अध्यापक विद्यालये ही विनाअनुदानित होती. म्हणून शिक्षकांना सुधारीत वेतनानुसार वेतन दिले जात नव्हते. वर्षातून महागाई भत्त्यामध्ये दोन वेळा होणारी वाढ देणे शक्य नव्हते. पगार कमी असल्यामुळे शिक्षक जास्त काळ रहात नव्हते इत्यादी समस्या येत होत्या असे प्राचार्यांनी सांगितले.

संशोधकाने शिक्षकांच्या मुलाखतीमध्ये नसल्यास कोणत्या समस्या येतात ? असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील २०(५८.८२%) प्रतिसादक शिक्षकांनी सांगितले की, सुधारीत वेतनानुसार वेतन दिले जात नव्हते. वर्षातून महागाई भत्त्यामध्ये दोन वेळा होणारी वाढ देणे शक्य नव्हते. शिक्षण फीमधून कमी वेतन दिले जात होते. त्यामुळे शिक्षक जास्त काळ रहात नव्हते. तसेच डी.एड शिक्षकांना भविष्य नाही. इत्यादी समस्या येत होत्या.

यावरून १०(५८.८२%) विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षकांना सुधारीत वेतन देणे शक्य नव्हते. महागाई भत्ता वर्षातून दोन वेळा देणे शक्य नव्हते. शिक्षक फीमधून कमी वेतन दिले जात होते. त्यामुळे शिक्षक जास्त काळ रहात नव्हते इत्यादी समस्या येत होत्या.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ९०वा, सोबत दिलेल्या प्रश्नावली खेरीज या संशोधनाच्या दृष्टीने कांही सुचवावयाचे असल्यास माहिती द्यावी असा विचारला होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयापैकी ५ अध्यापक विद्यालयातील प्राचार्यांनी संशोधनाच्या दृष्टीने माहिती दिली. ती पुढील प्रमाणे.

- ❖ प्राचार्य, श्री.शिवाजी ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन, नेहरू नगर, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की,

१. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धेमध्ये भाग घेण्यास व्यासपीठ उपलब्ध होते पण डी.एड मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अशी सोय नाही. म्हणून आम्ही सोलापूर जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयातील प्राचार्यांची एक संघटना तयार केली आहे व या संघटनेद्वारे क्रीडा स्पर्धा, शैक्षणिक सहित्य निर्मिती स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा कथाकथन स्पर्धा, समूह गायन स्पर्धा, लोकनृत्य स्पर्धा घेतल्या जातात. डी.एड विद्यालयांसाठी शासनाने स्पर्धा घेण्यास व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे.

२. सध्या डी.एड मध्ये २० विद्यार्थ्यांमागे एक प्राध्यापक आहे. पाठांची संख्या विचारात घेता प्रत्येक वेळी एक प्राध्यापक एकाच विद्यार्थ्याचे पाठनिरीक्षण करणे शक्य होत नाही. म्हणून सुरूवातीचे निम्मे पाठ आम्ही एक-एक या प्रमाणे पाहतो. नंतर एका वेळी दोन पाठ

पाहतो. नवीन NCTE च्या नियमाप्रमाणे १२ विद्यार्थ्यास एक प्राध्यापक असे प्रमाण आहे. पण अजून तरी महाराष्ट्र शासनाने तशी अनुमती दिली नाही. विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील फी विचारात घेतल्यास वरीलप्रमाणे प्रमाण ठेवणे शक्य नाही असे सूचविले.

❖ प्राचार्य, अध्यापक विद्यालय, एखतपूर, ता. सांगोला, जि. सोलापूर यांनी राज्य शासनाने आवश्यक नोकर भरती करण्यासाठी संस्थेस परवानगी देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे NCTE च्या नियमानुसार एम. एड ही शैक्षणिक पात्रता जुन्या शिक्षकांना प्राप्त करून देण्यासाठी विद्यापीठ किंवा राज्य शासनाने योग्य ती व्यवस्था करणे आवश्यक आहे. अवांतर उपक्रम जे आहेत त्यामधून शिक्षकांना मुक्त करण्यात यावे. नियमबाह्य वागणा-या कर्मचा-यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शैक्षणिक संस्थेस योग्य अधिकार देणे आवश्यक वाटते असे सूचविले.

❖ प्राचार्य, संभाजीराव शिंदे अध्यापक विद्यालय, सोलापूर यांनी.

१. पात्र शिक्षक होण्यासाठी शिक्षकांना मुदत व संधी द्यावी.

२. पगार पूर्ण मिळण्याची व्यवस्था सरकारने करावी.

३. प्राथमिक व माध्यमिक किंवा ज्युनियर, सिनियर प्रमाणे डी. एड विनाअनुदानित शिक्षकांना भविष्य निर्वाह निधी देण्यात यावे यासाठी शासनाने प्रयत्न करावेत असे सूचविले.

❖ प्राचार्य, अध्यापक विद्यालय, अक्कलकोट यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, अध्यापक विद्यालयातील जवळ जवळ ३० ते ३५% पेक्षा जादा विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप किंवा फी मध्ये सवलत मिळते. उदा. N.T., S.T., S.C. विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप माध्यमिक व प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना फी माफी, अपंग व स्वातंत्र्य सैनिक/माजी सैनिकांच्या मुलांना सवलती या सर्व बंद करून सर्व विनाअनुदानित विद्यालये अनुदानित करावीत. विद्यार्थ्यासाठी एवढी सवलत न ठेवता हाच पैसा शासनाने विनाअनुदानित विद्यालयातील शिक्षकांसाठी खर्च करावा.

तसेच राज्यातील सर्व अध्यापक विद्यालयात वेळापत्रक, कार्यभार, शिक्षक स्टाफ या संबंधाने एकवाक्यता असावी. जिल्हा स्तरावर विभागीय स्तरावर सर्व प्राचार्यांनी एकत्रीत येऊन त्यांच्यामध्ये विचारांची देवाणघेवाण करून सुसंवाद साधला जावा असे सूचविले.

❖ प्राचार्य, एम.ए.यु.एस. उर्दू अध्यापक विद्यालय, मैंदर्गी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, सर्व विनाअनुदानित अध्यापक विद्यालये शासनामार्फत चालविणे योग्य राहिल. त्याशिवाय चांगले शैक्षणिक कार्य होणार नाही. शासनाच्या नवीन धोरणानुसार एम.एड. शिक्षक मागितले जावेत. अनुभव मागितला जातो पण शिक्षकांच्या वेतनाचा व भवितव्याचा विचार केला जात नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालये अनुदानित करावीत किंवा विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांचा शासनाला बोजा वाटत असेल तर घेतलेली फी प्राचार्य किंवा संस्थेला न देता शासन ट्रेझरी मार्फत सर्क्युलेशन केले पाहिजे.

डोनेशन घेणे व ५०% प्रवेश बंद केले पाहिजे. त्यांच्या मते वरील बाबींची अंमलबजावणी शासनामार्फत झाली तर भारताची व महाराष्ट्राची प्रगती होण्याची कल्पना साकार होईल असे सूचविले.

यावरून बहुसंख्य प्राचार्यांची मागणी विनाअनुदानित अध्यापक विद्यालये ही अनुदानित करावीत. शिक्षकांचे वेतन हे सुधारीत वेतनश्रेणीनुसार देण्यात यावे या सूचना स्वागतार्ह आहेत असे संशोधकाला वाटते.

**५.३ मुलाखतीद्वारे मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.**

**अ. शिक्षकांच्या मुलाखतीच्या द्वारे मिळालेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.**

प्रश्नावलीतून मिळालेल्या माहितीची सत्यता पटविण्यासाठी संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयातील एक कला शाखेचा व एक विज्ञान शाखेचा असे प्रत्येक विद्यालयातील दोन शिक्षक या प्रमाणे ३४ शिक्षकांच्या मुलाखती घेतल्या. ही मुलाखत सूची परिशिष्ट ४ मध्ये दिलेली आहे.

**१. शिक्षकांच्या प्रशासनाविषयक माहिती :-**

या विभागातील पहिला प्रश्न शिक्षकांच्या नावासंबंधी होता. शिक्षकांच्या नावाची यादी परिशिष्ट ५ मध्ये दिलेली आहे.

प्रश्न क्रमांक दुसरा प्रतिसादकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रते संबंधी होता. या माहितीचे वर्गीकरण कोष्टक क्र.५.३३ मध्ये दिली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.३३**

**शिक्षकांचे शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | बी.ए.बी.एड. | १० | २९.४२ |
| २. | बी.एस्सी.बी.एड. | १२ | ३५.२९ |
| ३. | एम.ए.बी.एड. | ०३ | ०८.८२ |
| ४. | एम.ए.एम.एड. | ०४ | ११.७७ |
| ५. | एम.एस्सी.एम.एड. | ०२ | ०५.८८ |
| ६. | एम.एस्सी.बी.एड. | ०३ | ०८.८२ |
| | एकूण. | ३४ | १००.०० |

वरील कोष्टक क्र.५.३३ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयातील ३४ शिक्षकांच्या मुलाखती घेतल्या. त्यापैकी १०(२९.४२%) शिक्षक बी.ए.बी.एड होते. १२(३५.२९%) शिक्षक बी.एस्सी.बी.एड होते. ३(८.८२%) शिक्षक एम.ए.बी.एड होते. ४(११.७७%) शिक्षक एम.ए.एम.एड होते. २(५.८८%) शिक्षक एम.एस्सी.एम.एड होते. ३(८.८२%) शिक्षक एम.एस्सी.बी.एड होते.

यावरून सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांमध्ये १२(३५.२९%) प्रतिसादक शिक्षक पदव्युत्तर होते तर २२(६४.७१%)प्रतिसादक शिक्षक आवश्यक पात्रताधारक होते. ही बाब समाधानकारक होती.

प्रश्न क्रमांक तिसरा, अध्यापक विद्यालयाच्या नावाविषयी होता. विद्यालयांच्या नावाची यादी परिशिष्ट क्र.१ मध्ये दिली आहे.

प्रश्न क्रमांक चौथा, आपली नेमणूक तात्पुरती की कायम स्वरूपी आहे? असा विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, २२(६४.७०%)प्रतिसादक शिक्षकांची नेमणूक कायम स्वरूपी होती. तर १२(३५.३०%)प्रतिसादक शिक्षकांची नेमणूक तात्पुरत्या स्वरूपाची होती.

यावरून २२(६४.७०%) प्रतिसादक शिक्षक कायम होते तर १२(३५.३०%) प्रतिसादक शिक्षकांची नेमणूक तात्पुरत्या स्वरूपाची होती. ही बाब समाधानकारक वाटत नाही.

शिक्षणाचा पाया हा प्राथमिक शिक्षण आहे. प्राथमिक शिक्षक घडविण्याचे कार्य अध्यापक विद्यालयांमार्फत केले जाते. प्रत्येक अध्यापक विद्यालयांमध्ये कार्य करणारा शिक्षक हा कायम स्वरूपी असला पाहिजे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्रमांक पाचवा, आपण शिक्षक म्हणून अध्यापक विद्यालयांमध्ये किती वर्षे काम करीत आहात? असा विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.३४ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.३४**

**शिक्षकांच्या अनुभवाचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १ वर्षापेक्षा कमी. | ०४ | ११.७७ |
| २. | १ वर्ष ते १० वर्षे. | १९ | ५५.८९ |
| ३. | ११ वर्षे ते २० वर्षे. | ०६ | १७.६४ |
| ४. | २१ पेक्षा जास्त. | ०५ | १४.७० |
| | एकूण. | ३४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३४ वरून असे दिसून येते की, सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयातील ३४ शिक्षकांपैकी ४(११.७७%) प्रतिसादक शिक्षकांचा एक वर्षापेक्षा कमी अनुभव होता. १९ (५५.८९%) प्रतिसादक शिक्षक एक वर्ष ते १० वर्षापर्यंतचा अनुभव असणारे होते. ६(१७.६९%) प्रतिसादक शिक्षक ११ वर्षे ते २० वर्षापर्यंतचा अनुभव असणारे होते. ५(१४.७०%) प्रतिसादक शिक्षक २१ वर्षापेक्षा जास्त अनुभव असणारे होते.

यावरून मुलाखतीसाठी निवडलेले शिक्षक योग्य त्या अनुभवाचे होते असे दिसून आले.

शिकवण्याचा अनुभव जास्त होता परंतु त्या शिक्षकांचा अध्यापनाचा विषय कोणता आहे हे पाहण्यासाठी प्रश्न क्र.६वा, आपण कोणत्या अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण घेतले आहे? असा विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.३५ मध्ये दिलेली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.३५**

**अध्यापन पद्धतीनुसार वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मराठी. | १० | २९.४१ |
| २. | इतिहास. | ६ | १७.६४ |
| ३. | हिंदी. | ५ | १४.७० |
| ४. | इंग्रजी. | ८ | २३.५२ |
| ५. | भूगोल. | ५ | १४.७० |
| ६. | विज्ञान. | १७ | ५०.०० |
| ७. | गणित. | १७ | ५०.०० |

टीप :- मुलाखतीसाठी निवडलेल्या प्रतिसादक शिक्षकांनी दोन विषय अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण घेतले असे सांगितले. म्हणून प्रतिसादक संख्या ३४ पेक्षा अधिक येते.

वरील कोष्टक क्रमांक ५.३५ वरून असे दिसून येते की, ३४ पैकी १७ शिक्षक (५०%) कला शाखेचे मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल अध्यापन पद्धती असणारे होते तर १७ (५०%) विज्ञान शाखेचे विज्ञान गणित अध्यापन पद्धती असणारे होते.

यावरून मुलाखतीसाठी निवडलेले शिक्षक कला शाखेचे मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षणापेक्षा विज्ञान शाखेचे विज्ञान व गणित अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांचे प्रमाण जास्त होते.

प्रश्न क्रमांक ७वा, त्याच अध्यापन पद्धतीचे अध्यापन करता का? असा विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२३ (६७.६४%) शिक्षकांनी अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण घेतलेल्या विषयाचे अध्यापन करतो असे सांगितले तर ११(३२.३६%) शिक्षकांनी इतर विषयाचे अध्यापन करतो असे सांगितले. त्याच विद्यालयांमध्ये त्याच विषयाचे अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण घेतलेले जास्त शिक्षक होते. त्यामुळे त्यांना इतर विषयाचे अध्यापन करावे लागत होते.

यावरून बहुसंख्य शिक्षक आपल्या पदवीच्या व प्रशिक्षणातील अध्यापन पद्धतीच्या विषयाचेच अध्यापन करीत होते, ही बाब समाधानकारक होती.

प्रश्न क्रमांक ८वा, आपणास इतर शिक्षकांचे सहकार्य मिळते काय? असा विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२६(७६.४७%) शिक्षकांना इतर शिक्षकांचे सहकार्य मिळत होते असे सांगितले तर ८(२३.५३%) शिक्षकांना त्यांच्या वैयक्तिक मतभेद, राजकीय प्रश्न या कारणामुळे इतर शिक्षकांचे सहकार्य मिळत नव्हते असे सांगितले.

यावरून मुलाखतीसाठी निवडलेल्या बहुसंख्य(७६.४७%) शिक्षकांना इतर शिक्षकांचे सहकार्य मिळत होते. ही बाब समाधानकारक होती.

प्रश्न क्रमांक ९वा, नसल्यास कोणती अदचण येते? असा विचारला होता. त्यावेळी त्यांनी पुढील उत्तरे दिली.

२६(७६.४७%) शिक्षकांना इतर शिक्षकांचे सहकार्य मिळत होते म्हणून त्यांना कोणत्याच अडचणी येत नव्हत्या. तर ८(२३.५३%) शिक्षकांना सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये विद्यार्थी गोंधळ करतात. त्याकडे इतर शिक्षक लक्ष देत नव्हते, सहल, परिक्षा इत्यादी मध्ये अडचणी येत होत्या.

यावरून ८(२३.५३%) शिक्षकांना सांस्कृतिक कार्यक्रम, सहल, परिक्षांमध्ये अडचणी येत होत्या. शिक्षकांनी इतरांचे सहकार्य मिळविण्यासाठी वैयक्तिक मतभेद विसरून मैत्रीपूर्ण संबंध वाढवावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.१0वा, अध्यापन कक्षामधील फलक व प्रकाश योजना शैक्षणिक दृष्टया योग्य आहे का? असा विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांनी दिलेल्या माहितीवरून १४(४१.१८%) शिक्षकांनी अध्यापन कक्षामधील फलक व प्रकाश योजना शैक्षणिक दृष्टया योग्य होती असे सांगितले. तर २0 (५८.८२%) शिक्षकांनी अध्यापन कक्षामधील फलक व प्रकाश योजना शैक्षणिक दृष्टया योग्य नव्हती असे सांगितले.

यावरून वर्गखोल्या प्रकाशाच्या दृष्टीने इतक्या योग्य नव्हत्या असे दिसून येते.

प्रश्न क्र.११, १२, १३ व १४ वरून आलेली माहिती प्रश्नावलीतील संबंधित माहितीला जोडून दिली आहे.

प्रश्न क्रमांक १५वा, सूक्ष्म अध्यापन पाठाच्या वेळी आपण कोणकोणत्या कौशल्याचे दिग्दर्शन करता? असा विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र.५.३६ मध्ये दिली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.३६**

**सूक्ष्म अध्यापन पाठाच्या कौशल्याचे वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्रस्तावना. | ४ | ११.७६ |
| २. | स्पष्टीकरण. | ८ | २३.५२ |
| ३. | कथन. | ७ | २०.५८ |
| ४. | चेतक बदल. | ८ | २३.५२ |
| ५. | प्रश्नोत्तर. | ५ | १४.७० |
| ६. | फलक लेखन. | १० | २९.४१ |
| ७. | प्रयोग दिग्दर्शन. | १७ | ५०.०० |
| ८. | दृकश्राव्य साधनांचा वापर. | २ | ५.८८ |

टीप :- मुलाखतीमध्ये प्रतिसादक शिक्षकांनी सूक्ष्म अध्यापन पाठाच्या वेळी एकापेक्षा अधिक कौशल्याचे दिग्दर्शन केले होते. म्हणून प्रतिसादक संख्या ३४ पेक्षा अधिक येते.

वरील कोष्टक क्र.५.३६ वरून असे दिसून येते की, मुलाखतीसाठी निवडलेल्या ३४ शिक्षकांपैकी ४(११.७६%) शिक्षकांनी सूक्ष्म अध्यापन पाठाच्या वेळी प्रस्तावना कौशल्याचे दिग्दर्शन केले होते. ८(२३.५२%) शिक्षकांनी स्पष्टीकरण कौशल्याचे दिग्दर्शन केले होते. ७(२०.५८%) शिक्षकांनी कथन कौशल्याचे, ८(२३.५२%) शिक्षकांनी चेतक बदल कौशल्याचे, ५(१४.७०%) शिक्षकांनी प्रश्नोत्तर कौशल्याचे, १०(२९.४१%) शिक्षकांनी फलक लेखन कौशल्याचे व १७(५०%) शिक्षकांनी प्रयोग दिग्दर्शन कौशल्याचे तर २(५.८८%) शिक्षकांनी दृकश्राव्य साधनाचा वापर या कौशल्याचे दिग्दर्शन केले होते.

यावरून २० ते ५०% शिक्षक अनुक्रमे स्पष्टीकरण, कथन, प्रयोग दिग्दर्शन, चेतक बदल, फलक लेखन या कौशल्याचे दिग्दर्शन करीत होते. ही कौशल्ये जास्त महत्वाची असल्याने या

कौशल्याकडे जास्त लक्ष देत असल्याची बाब चांगली आहे. इतर कौशल्याचे मार्गदर्शनही १० ते २०% शिक्षक करीत होते.

प्रश्न १६वा, सूक्ष्म अध्यापनाचे पाठ घेत असताना कोणत्या अडचणी आल्या? त्या कशा दूर केल्या? असा विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांकडून प्राप्त झालेल्या माहितीवरून १५ (४४.११%) शिक्षकांना विद्यार्थ्यांची पाठाची तयारी अपूर्ण, शैक्षणिक साहित्याचा अभाव, फलक लेखनाचा अभाव इत्यादी अडचणी येत होत्या. त्या विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून वरील अडचणी दूर केल्या असे त्यांनी सांगितले. १२ (३५.३०%) शिक्षकांना विद्यार्थ्यांना ५ मिनिटे कालावधीत घटक घेताना नेमका घटक किती घ्यावयाचा याचे नियोजन करणे कठीण वाटत होते. त्याच बरोबर विषय विवेचन करताना विद्यार्थ्यांची मानसिक तयारी नव्हती. आपण निवडलेला घटक ५ मिनिटात होतो की नाही याची खात्री वाटत नव्हती. तसेच कौशल्यातील प्रत्येक उपघटक प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सूक्ष्म अध्यापनात येतीलच असे नव्हते. त्यामुळे अध्यापकाने घेतलेले कौशल्य परिपूर्ण होत नव्हते. इत्यादी अडचणी येत होत्या. यावरती सर्व प्रथम विद्यार्थ्यांची मानसिक तयारी करून घेतली होती. कौशल्यांचा सराव करून घेणे म्हणजे पहिल्या सूक्ष्म अध्यापनात चूका होत असतील तर त्या दुरूस्त करून पुन्हा अध्यापन करण्यास सांगितले जात होते. अशा रितीने वरील अडचणी दूर केल्या असे त्यांनी सांगितले.

७ (२०.८८%) शिक्षकांना कथन, स्पष्टीकरण, प्रश्नोत्तर या कौशल्यामध्ये अडचणी येत होत्या असे त्यांनी सांगितले. वेळोवेळी मार्गदर्शन करून अडचणी दूर केल्या असे त्यांनी सांगितले.

प्रश्न क्रमांक १७, १८, १९, २०, २१ व २२ या वरून आलेली माहिती प्रश्नावलीतील संबंधीत माहितीला जोडून दिली आहे.

प्रश्न क्र.२३वा, सराव पाठाचे नियोजन व अंमलबजावणी बाबत कोणत्या सुधारणा सूचवाल? असा विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांकडून प्राप्त झालेल्या माहितीवरून शिक्षक मार्गदर्शनाखाली अध्यापकाचे सराव पाठ घेताना पाठाचे नियोजन शिक्षक - विद्यार्थी - मुख्याध्यापक यांच्या समन्वयाने व्हावे असे २९ (८५.२९%) शिक्षकांनी सूचविले. ५ (१४.७१%) शिक्षकांनी सराव पाठांची संख्या कमी होती. त्यामध्ये वाढ करण्यात यावी. प्रत्येक पाठाचे निरीक्षण व्यवस्थित व्हावे असे सूचविले.

प्रश्न क्रमांक २४, २५ यावरून आलेली माहिती प्रश्नावलीतील संबंधीत माहितीला जोडून दिली आहे.

२. **विद्यार्थी प्रशासनाविषयी माहिती.**

या विभागातील प्रश्न क्र.२६, २७, २८ वरून आलेली माहिती प्रश्नावलीतील संबंधित माहितीला जोडून दिली आहे.

प्रश्न क्रमांक २९वा, अध्यापक विद्यालयात कोणकोणते सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात? असा विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.३७ मध्ये दिली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.३७**

**सांस्कृतिक कार्यक्रमानुसार वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | सर्व जयंती. | ३१ | ९१.१७ |
| २. | सर्व पुण्यतिथी. | १७ | ५०.०० |
| ३. | हिंदी दिन. | १४ | ४१.१७ |
| ४. | पर्यावरण दिन. | ०९ | २६.४७ |
| ५. | स्नेहसंमेलन. | २९ | ८२.२९ |
| ६. | राष्ट्रीय सण. | ३४ | १००.०० |

टीप : मुलाखतीमध्ये प्रतिसादक शिक्षक एकापेक्षा अधिक सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करीत होते. म्हणून प्रतिसादक संख्या ३४ पेक्षा अधिक येते.

वरील कोष्टक क्रमांक ५.३७ वरून असे दिसून येते की, ३१(९१.१७%) शिक्षकांच्या अध्यापक विद्यालयात सर्व जयंतीचे कार्यक्रम घेतले होते. १७(५०%) शिक्षकांच्या विद्यालयात पुण्यतिथीचे कार्यक्रम घेतले होते. १४(४१.१७%) शिक्षकांच्या विद्यालयामध्ये हिंदी दिनाचे कार्यक्रम घेतले होते. ९(२६.४७%) शिक्षकांच्या विद्यालयात पर्यावरण दिन साजरा करीत होते. २९(८२.२९%) शिक्षकांच्या अध्यापक विद्यालयामध्ये स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम घेतले होते. ३४(१००%) शिक्षकांच्या अध्यापक विद्यालयामध्ये राष्ट्रीय सण साजरे करीत होते.

प्रश्न क्रमांक ३0वा, अध्यापन शिबीराचे आयोजन केले जाते का? असा विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांकडून प्राप्त झालेली माहिती अशी की, २९(८२.२९%) शिक्षकांनी अध्यापन शिबीराचे आयोजन केले होते असे सांगितले. तर ५(१४.७१%) शिक्षकांनी अध्यापन शिबीराचे आयोजन केले नव्हते असे सांगितले.

यावरून मुलाखतीसाठी निवडलेल्या बहुसंख्य शिक्षकांनी अध्यापन शिबीराचे आयोजन केले होते. ही बाब समाधानकारक वाटत होती.

प्रश्न क्र.३१, ३२ व ३३ या वरून आलेली माहिती प्रश्नावलीतील संबंधीत माहितीला जोडून दिली आहे.

### ३. भौतिक सुविधांविषयी माहिती.

या विभागात प्रश्न क्र. ३४,३५,३६,३७,३८,३९,४0,४१,४२,४३,४४ व ४५ यावरून आलेली माहिती प्रश्नावलीतील संबंधित माहितीला जोडून दिली आहे.

प्रश्न क्र.४६वा, आपण कोणत्या विभागाचे काम पाहता? असा विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.३८ मध्ये दिली आहे.

**कोष्टक क्रमांक ५.३८**

**विभागाच्या कामानुसार वर्गीकरण.**

| अ.क्र | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मराठी. | ५ | १४.७0 |
| २. | हिंदी. | ३ | ८.८२ |
| ३. | इंग्रजी. | ४ | ११.७६ |
| ४. | गणित. | ७ | २0.५८ |
| ५. | विज्ञान. | ९ | २६.४७ |
| ६. | क्रीडा. | ३ | ८.८२ |
| ७. | परीक्षा. | ३ | ८.८२ |
| ८. | सांस्कृतिक. | ५ | १४.७0 |
| ९. | सहल. | ६ | १७.६४ |
| १0. | ग्रंथालय. | ३ | ८.८२ |
| ११. | सेवांतर्गत प्रशिक्षक. | १ | २.९४ |

टीप : मुलाखतीमध्ये प्रतिसादक शिक्षक एकापेक्षा अधिक विभागाचे काम पहात होते असे सांगितले. म्हणून प्रतिसादक संख्या ३४ पेक्षा अधिक येते.

वरील कोष्टक क्र.५.३८ वरून असे दिसून येते की, प्रत्येकी ५(१४.७0%) शिक्षक मराठी, सांस्कृतिक ह्या विभागाचे काम पहात होते. प्रत्येकी ३(८.८२%) शिक्षक हिंदी, क्रीडा, परीक्षा, ग्रंथालय ह्या विभागाचे काम पहात होते. ४(११.७६%) शिक्षक इंग्रजी विभागाचे काम पहात होते. ७(२0.५८%) शिक्षक गणित विभागाचे काम पहात होते. ९(२६.४७%) शिक्षक विज्ञान विभागाचे, ६(१७.६४%) शिक्षक सहल विभागाचे व एक(२.९४%) शिक्षक सेवांतर्गत प्रशिक्षण विभागाचे काम पहात होते. हे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथे वरिष्ठ शिक्षक होते. म्हणून त्यांच्याकडे हा विभाग सोपविला होता.

यावरून प्रत्येक अध्यापक विद्यालयांचे वेगवेगळे विभाग वेगवेगळया शिक्षकास पाहण्यास देताना कामाची वाटणी योग्य प्रकारे देण्याचे दिसून आले. जिल्ह्यामध्ये एक शिक्षण व प्रशिक्षण संस्था आहे. तेथे सेवांतर्गत विभाग असल्याचे दिसून आले.

## ४. आर्थिक विषयी माहिती.

या विभागातील प्रश्न क्रमांक ४७,४८,४९ यावरून आलेली माहिती प्रश्नावलीतील संबंधित माहितीला जोडून दिली आहे.

## ५. अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनात सुचविलेल्या सुधारणा.

या विभागातील प्रश्न क्रमांक ५0वा, तुम्ही अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनात कोणत्या सुधारणा सुचवाल? असा विचारला होता. प्रतिसादक शिक्षकांकडून प्राप्त झालेल्या माहितीवरून (कंसातील अंक वारंवारिता दर्शविते.)

१. वर्ष - परीक्षा कालावधी, इतर शाळा महाविद्यालयासारखे जून ते एप्रील असावे. (१५)

२. अध्यापक विद्यालयात सर्व नवीन शैक्षणिक योजना उदा.स्मार्ट पी.टी इ.उपक्रमांची माहिती दिली जावी. (१७)

३. अध्यापक विद्यालयाची वेळ सकाळी ७.१५ ते १२.३0 असावी म्हणजे अध्यापन दुपारपेक्षा अधिक प्रभावी हाईल कारण सकाळची वेळ उत्साहवर्धक असते. (१२)

४. विषयानुरूप शिक्षकांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. (१0)

५. विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा व साधने पुरवावीत, जागेचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांसाठी नवीन उपक्रमाची आखणी करून द्यावी. सर्वांना भौतिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. (४)

यावरून बहुसंख्य शिक्षकांची मागणी अध्यापक विद्यालयाची वेळ सकाळी ७.१५ ते १२.३0 असवी अशी होती. विद्यालये इतर शाळा महाविद्यालयाच्या बरोबरीने सुरू व्हावीत व सुट्टया त्यांच्या प्रमाणेच असाव्यात. नवीन उपक्रमाची, स्मार्ट पी.टी., इत्यादीची माहिती प्रशिक्षण काळातच दिली जावी.

या सूचना स्वागतार्ह आहेत असे संशोधकाला वाटते.

**ब. शिक्षणाधिकारी (मा) व उपशिक्षणाधिकारी (मा) यांच्या मुलाखतीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन.**

शासनाने नियुक्त केलेले प्रशासकीय अधिकारी शिक्षणाधिकारी (मा) हे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात जिल्ह्याचे प्रमुख असतात. त्यांना मदत करण्यासाठी उपशिक्षणाधिकारी हे असतात. त्यासाठी संशोधकाने निवडलेल्या सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर येथे जाऊन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व उपशिक्षणाधिकारी यांची मुलाखत संशोधकाने घेतली. या मुलाखतीची प्रश्नसूची तयार केली होती. त्यामध्ये एकूण १५ प्रश्नांचा समावेश केलेला होता. शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी अशी एकूण २ अधिका-यांची मुलाखत संशोधकाने घेतली. ही मुलाखत सूची परिशिष्ट क्रमांक ६ मध्ये दिलेली आहे व मुलाखत घेतलेल्या शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिका-यांच्या नावाची यादी परिशिष्ट क्रमांक ७ मध्ये दिलेली आहे.

**१. सर्व सामान्य प्रश्न.**

१ला प्रश्न हा नावाबद्दल विचारला होता व २रा प्रश्न हा त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेबद्दल विचारला होता. प्रतिसादक अधिका-यांची नावे व शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता हे परिशिष्ट क्रमांक ७ मध्ये ही यादी दिलेली आहे.

२. अध्यापक विद्यालयांच्या प्रशासनाविषयीची माहिती.

३रा प्रश्न अध्यापक विद्यालयांच्या आर्थिक व्यवहारावर कसे नियंत्रण ठेवता? असा विचारला होता. जिल्ह्यातील अनुदानित अध्यापक विद्यालयांना १२% वतनेतर अनुदान उपलब्ध करून देतो असे सांगितले. शिक्षकांचे वेतन उपसंचालकांच्या मार्गदर्शनानुसार मंजुर करून दिले जाते असे सांगितले. ४था प्रश्न आपण एका अध्यापक विद्यालयाला वर्षातून कितीवेळा भेटी देता? असा विचारला होता. शिक्षणाधिका-यांनी एका अध्यापक विद्यालयाला वर्षातून एकदा भेट देतो असे सांगितले तर उपशिक्षणाधिका-यांनी किमान २ वेळा भेटी देतो असे सांगितले.

यावरून वर्षातून एकदा अध्यापक विद्यालयांना भेटी देतात हे दिसले. ही बाब चांगली आहे असे संशोधकाला वाटते.

५वा प्रश्न अध्यापक विद्यालय तपासणीमध्ये कोणत्या गोष्टी पाहता? असा विचारला होता.

शिक्षणाधिकारी (मा) व उपशिक्षणाधिका-यांनी कार्यालयीन नोंदी, जमाखर्च नोंदी, पुस्तकांची नवीन खरेदी व खतावणी, प्रयोगशाळा व प्रयोगाचे साहित्य, क्रीडा साहित्य, पूर्वीच्या तपासणी वेळच्या नोंदी व तपासणी अहवाल पाहून त्याप्रमाणे सूचनांचे पालन केलेले आहे का? या बाबी प्रामुख्याने पाहतो. तसेच विद्यार्थी संख्या, भौतिक सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि अभ्यासक्रम कसा व किती शिकविण्यात आला आहे हे विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून, प्रत्यक्ष वर्गात जाऊन खात्री करतो व शिक्षकांचे अध्यापन निरीक्षण करण्यात येते. अशी कामे तपासणीवेळी करतो असे प्रतिसादक अधिका-यांनी सांगितले.

६वा प्रश्न विद्यालय तपासणीच्या वेळी कोणत्या सूचना करतात? असा विचारला होता. कार्या लयीन नोंदीच्या बाबतीत उणिवा असलेल्या पूर्ण कराव्यात, निकालाचे प्रमाण वाढवावे, अनुशेष भरला नसल्यास त्याच्याही नोंदी केल्या जातात. भौतिक सुविधा अपु-या असल्यास त्याचीही नोंद केली जाते व शिक्षकांचे अध्यापन अभ्यासक्रमात जर दोष वाटले तर त्यांनाही तोंडी सूचना करतो असे शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिका-यांनी चर्चेतून सांगितले.

७वा प्रश्न, प्राचार्य, शिक्षक व इतर कर्मचारी यांची खातेनिहाय चौकशी असल्यास आपणामार्फत होते काय? असा विचारला होता.

प्राचार्य, शिक्षक व इतर कर्मचारी यांची खातेनिहाय चौकशी केली जाते असे शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिका-यांनी सांगितले.

प्रश्न ८वा, शिक्षक अनधिकृतपणे अनुपस्थित असल्यास आपण कोणती कार्यवाही करता? असा विचारला होता.

शिक्षक अनधिकृतपणे अनुपस्थित असल्यास गैरहजर केले जाते तर जास्त दिवस अनुपस्थित असल्यास वेतनवाढ रोखले जाते असे सांगितले. यावरून जिल्हा प्रशासनाचे अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनावर लक्ष आहे असे दिसून आले.

प्रश्न ९वा, अध्यापक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश कोणत्या माध्यमासाठी दिला जातो? असा विचारला होता.

केंद्रिय पद्धतीने गुणवत्तेनुसार विद्यार्थ्याला मराठी माध्यमासाठी तसेच थोडयाफार विद्यार्थ्यांना इंग्रजी, कन्नड, उर्दू माध्यमासाठी प्रवेश दिला जातो असे प्रतिसादक अधिका-यांनी सांगितले.

प्रश्न १0वा, अध्यापक विद्यालयातील प्रवेश प्रक्रिया बद्दलच्या समस्या कोणत्या? असा विचारला होता.

शैक्षणिक दृष्टया अप्रगत जिल्ह्यातील कमी टक्केवारी असलेल्या विद्यार्थ्यांची निवड होत नाही. त्या जिल्ह्यावरती केंद्रिय पद्धतीने विद्यार्थ्यांची निवड असल्यामुळे अन्याय होतो. ही समस्या प्रवेश प्रक्रिया बद्दलची होती असे प्रतिसादक अधिका-यांनी सांगितले.

प्रश्न ११वा, विनाअनुदानित विद्यालयातील शिक्षकांच्या वेतनाबाबत कोणत्या समस्या असतात? असा विचारला होता.

विनाअनुदानित विद्यालयातील शिक्षकांना सुधारित वेतन दिले जात नव्हते. वर्षातील दोन वेळा होणारी महागाई भत्ता दिले जात नव्हते. सेवानिवृत्त वेतन दिले जात नव्हते. इत्यादी समस्या येत होत्या असे सांगितले.

प्रश्न १२वा, आपणास कोणकोणत्या बैठकीस उपस्थित रहावे लागत? असा विचारला होता.

शिक्षण मंत्र्यानी आयोजित केलेल्या, संचालकांनी आयोजित केलेल्या, उपसंचालक व जिल्हाधिकारी यांनी आयोजित केलेल्य बैठकीस उपस्थित रहावे लागते असे शिक्षणाधिका-यांनी सांगितले.

प्रश्न १३वा, आपण दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी होते काय? असा विचारला होता.

शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी यांनी सूचनांची अंमलबजावणी होते असे सांगितले. यावरच आधारित पुढील प्रश्न १४वा विचारला होता. आपल्या सूचनांची अंमलबजावणी होत नसल्यास कोणती कार्यवाही करता. ६ अध्यापक विद्यालयात सूचनांची अंमलबजावणी होते त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. ११ अध्यापक विद्यालयात अपवादात्मक परिस्थिती नोकरभरती वेळी अनुशेष न भरणे, आवश्यक साधने प्रत्यक्षात खरेदी न करणे असा प्रकार होतो त्यावेळी आम्ही त्या बाबतची नोंद करून उपसंचालकांना ही माहिती कळवितो असे सांगितले.

## ३. प्रशासनात सुचविलेल्या सुधारणा.

प्रश्न १५वा, आपल्या मते शैक्षणिक प्रशासनात कोणत्या सुधारणा असाव्यात? असा विचारला होता.

शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिका-यांनी कामाची खातेनिहाय विभागणी करून त्या विभागावर शिक्षकांना प्रमुख म्हणून संधी द्यावी, शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देण्यात यावे, प्रशिक्षण घेतलेले विषय शिक्षकांना अध्यापनासाठी देण्यात यावे, कामाची वाटणी समान असावी, सुधारित वेतनानुसार विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना वेतन देण्यात यावे, शिक्षकांची सेवापुस्तके अद्ययावत असावीत, सर्व शिक्षकांना सारखेपणाचीच वागणूक असावी अशा वरील प्रशासनात सुधारणा सुचविलेल्या आहेत.

## ५.४ भेटीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण.

परिशिष्ट क्र.८ मध्ये भेटी दिलेल्या १७ अध्यापक विद्यालयांच्या नावाची यादी दिली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांची स्थिती, इमारत, इमारतीमध्ये उपलब्ध असणा-या भौतिक शैक्षणिक सुविधा, शैक्षणिक साधने, ग्रंथालय व ग्रंथालयाची संपन्नता, प्रयोगशाळा व प्रयोगशाळेतील साहित्य, क्रीडांगण व खेळाचे साहित्य, वसतीगृह व इतर सुविधा, शाळांचे दैनंदिन

कामकाज, उपलब्ध शिक्षक वर्ग या बाबतीत समक्ष भेटीतून माहिती उपलब्ध करणे हा हेतू भेटीच्या संदर्भात होता.

परिशिष्ट क्र ८ मध्ये दिल्याप्रमाणे अध्यापक विद्यालयांना भेटी देण्यासाठी निरीक्षण घटक प्रथम ठरविले आणि प्रत्यक्ष भेटी मध्ये त्या त्या घटकांच्या संदर्भात निरीक्षण केले. प्राचार्य, शिक्षक सांगत असलेली माहिती स्वत: संशोधकाने भेटीतून खात्री करून घेतली. बरेच प्राचार्य सत्य माहिती लपवीत होते हे भेटी अंती संशोधकाला दिसले आहे. संशोधकाने सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन पहाणी करून माहिती मिळविली.

१. **भौतिक सुविधांसंबंधी माहिती.**

अ. इमारत : भेटी व निरीक्षणाद्वारे मिळालेली माहिती प्रश्नावलीतील संबंधित माहितीला जोडून दिली आहे.

ब. स्वच्छतागृह व मुतारी : ८(४७.०६%) विद्यालयांना पुरेशा होत्या. ५(२९.४१%) विद्यालयांना अपुऱ्या प्रमाणात व नादुरूस्त अवस्थेत होत्या. तर ४(२३.५३%) विद्यालयांना स्वच्छतागृह व मुतारीची व्यवस्था अजिबात नव्हती हे दिसून आले.

क. फर्निचर : भेटी व निरीक्षणाद्वारे मिळालेली माहिती प्रश्नावलीतील संबंधित माहितीला जोडून दिली आहे.

ड. क्रीडांगण : भेटी व निरीक्षणाद्वारे मिळालेली माहिती प्रश्नावलीतील संबंधित माहितीला जोडून दिली आहे.

इ. वसतीगृह : ३(१७.६७%) विद्यालयांमध्ये वसतीगृहाची सोय फक्त मुलांसाठी होती. २(११.७६%) विद्यालयामध्ये वसतीगृहाची सोय फक्त मुलींसाठी होती तर १२(७०.५८%) विद्यालयांमध्ये वसतीगृहाची सोय नव्हती हे दिसून आले.

ई. ग्रंथालय : भेटी व निरीक्षणाद्वारे मिळालेली माहिती प्रश्नावलीतील संबंधित माहितीला जोडून दिली आहे.

उ. प्रयोगशाळा व शैक्षणिक साधने : भेटी व निरीक्षणाद्वारे मिळालेली माहिती प्रश्नावलीतील संबंधित माहितीला जोडून दिली आहे.

२. शिक्षकांसंबंधीची माहिती.

भेटी व निरीक्षणाद्वारे मिळालेली माहिती प्रश्नावलीतील संबंधित माहितीला जोडून दिली आहे.

५.५ समारोप.

या प्रकरणात प्रश्नावली, मुलाखती व भेटीद्वारे मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण कोष्टकाच्या सहाय्याने करून अर्थनिर्वचन केले आहे. पुढील प्रकरणात या माहितीवरून निष्कर्ष व शिफारशी दिल्या आहेत.